आमरसासह राजस्थानी थाळी
स्वादिष्ट.. रुचकर भोजनाचा आस्वाद घ्या..
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड,अहमदनगर. फोन : 2327060, 9850799850

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. १६.०५.२०२५ | अंक नं. ३९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

फक्त फायदाच फायदा !
खरेदीवर पॉइंट पॉइंटसवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

10वी तील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी
गोल्डन ऑफर
चेन व अंगठी खरेदीवर मिळवा
आपल्याला मिळालेल्या टक्केवारीएवढी
मजुरीत सूट*
योजना 16 मे 2025 पर्यंत लागू.
योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मुळ मार्कशीटची झेरॉक्स प्रत स्वत: घेवून येणे आवश्यक.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

DCM SHRIRAM Growing with trust
Fenesta Better by Design
भारताची नंबर 1 खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड
uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Shop No. 5, Venkatesh Prime, Near Anand Dham, Ahilya Nagar.
Call: 9860119223 / 9823189592

# महापालिकेतील अपहाराच्या गुन्ह्यातून डॉक्टर अनिल बोरगे यांचे नाव वगळले

## आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावाच नाही, पोलिसांचे न्यायालयात पत्र

नगर – शासनाकडून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला १५ व्या वित्त आयोगाव्दारे प्राप्त झालेल्या निधीतून १६ लाख ५० हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातून महापालिकेचे तत्कालीन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांचे नाव वगळण्यात आले आहे. डॉ. बोरगे यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावाच नाही असे पत्र पोलिसांनी न्यायालयात सादर केले आहे. त्यामुळे त्यांना बीएनएसएस १८९ प्रमाणे गुन्ह्यातून वगळण्यात आले आहे.

शासनाकडून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला १५ व्या वित्त आयोगाव्दारे प्राप्त झालेल्या निधीतून १६ लाख ५० हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी राष्ट्रीय आरोग्य अभियानचे शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे यांच्यावर फेब्रुवारी २०२५ मध्ये कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(पुढील मजकूर पान २ वर)

### सत्य परेशान हो सकता है, पराजित नही : अनिल बोरगे



या संदर्भात डॉ.बोरगे यांच्याशी संपर्क साधला असता सदर गुन्हा हा एका षडयंत्राचा भाग होता. मात्र कोणी कितीही षडयंत्र रचले तरी सत्य एक ना एक दिवस उजेडात येत असते. सत्य परेशान हो सकता है, पराजित नही अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच या अपहाराचा प्रकार डॉ.पंकज जावळे हे आयुक्त असताना आपणच उघडकीस आणला होता. तरीही विनाकारण आपल्याला या गुन्ह्यात गोवले गेले, हे पोलिस तपासात समोर आले असल्याचे ही त्यांनी सांगितले.

# भारतीय लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल भाजपचे मंत्री विजय शाह यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध

## मंत्रीपदाचा राजीनामा घ्या

नगर – भारतीय लष्करातील कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण खात्याचे मंत्री विजय शाह यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा पीपल्स हेल्पलाइनच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला आहे. तर या मंत्र्याचा ऑपरेशन दगड भेजा शेंदूर या प्रतीकात्मक संज्ञेद्वारे संतप्त प्रतिक्रिया नोंदवण्यात आली आहे.

लोकभज्ञाक तत्वज्ञानापासून दूर गेलेले नेतृत्व समाजासाठी घातक आहे. दगड भेजा म्हणजे जड, अचेतन व विवेकशून्य मन, तर शेंदूर हा सत्तेचा अयोग्य तिलक दर्शवतो. देशात अशा मंत्र्यांची मानसिकता समाजात दुफळी व खऱ्या देशभक्ती प्रेरित असलेल्या नागरिकांसाठी घातक आहे. या मंत्र्याच्या नेमणुकीवर टीका करुन, अशा व्यक्तींना नैतिकता, समज किंवा लोकाभिमुखतेचे भान नसतानाही सत्ता दिली जाते, ही लोकशाही मूल्यांची विटंबना असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. संबंधित मंत्री यांचे वर्तन हे लोकभज्ञाक मूल्यांशी सुसंगत नाही. त्यांच्या विधानातून स्त्रीद्वेष, अज्ञान आणि सामजिक असंवेदनशीलता झळकते. त्यांच्या म्हणण्यानुसार, हे मंत्री केवळ राजकीय समीकरणांमुळे सत्तेवर आले असून त्यांच्या नेतृत्वात लोकशक्ती, ज्ञानशीलता व नैतिक मूल्यांचा अभाव असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हटले आहे.

मंत्री विजय शाह यांनी तात्काळ सार्वजनिक माफी मागावी आणि पदाचा राजीनामा द्यावा, मंत्रीपदाच्या नैतिक, मानसिक आणि लोकाभिमुख पात्रतेचे स्वतंत्र मूल्यांकन व्हावे, देशातील नेतृत्व हे लोकभज्ञाक शुद्धतेच्या निकषांवर निवडले जावे, कर्नल सोफिया कुरेशी यांच्यासारख्या राष्ट्रसेवकांचा सन्मान आणि संरक्षण ही शासनाची जबाबदारी मानावी, अशी मागणी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवारी दालबाठी व चुरमा व दररोज आमरसचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर.
पार्सल सुविधा उपलब्ध...

# गुंतवणूकीतून जादा परताव्याच्या आमिषाने नगरच्या व्यावसायिकाची २४ लाख ७० हजारांची फसवणूक

नगर – मेक माय ट्रीप कंपनीच्या एजंट असलेल्या व्यक्तींनी ट्रॅव्हल्स कंपनीत गुंतवणूक केल्यास चांगले कमिशन देऊ असे आमिष दाखवून नगरमधील व्यावसायिकाची २४ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. ही घटना ३१ ऑगस्ट २०२४ ते ७ सप्टेंबर २०२४ दरम्यान घडली.

याबाबत योगी महेंद्र सबलोक (वय ४७, रा. कोठला रोड, सर्जेपुरा, अ.नगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा दुचाकी वाहनविक्रीचा व्यवसाय असून त्यांच्याकडे होंडा कंपनीची डिलरशीप आहे. नगर मधील बजाज कंपनीचे अधिकृत डीलर अनुज अनिल मित्तल (रा. पाईपलाईन रोड अ.नगर) यांच्याशी त्यांची व्यवसायाच्या अनुषंगाने ओळख होती. २०२४ मध्ये मित्तल यांनी त्यांची राहुल दर्शन जगताप व त्यांची पत्नी एंजल जगताप यांच्याशी ओळख करून दिली. तसेच जगताप हे बजाज कंपनीचे एरिया मॅनेजर आहेत असे सांगितले. त्यानंतर राहुल जगताप यांच्या पत्नीचे व्यवसायाबाबत यांना माहिती दिली की एंजल जगताप या मेक माय ट्रिप डॉट कॉम ऑनलाइन कंपनीची एजंट असून तिची स्वतःची रिजॉयस इव्हेंट ऑर्गनायझर (रिओ) ट्रॅव्हल्स नावाची कंपनी आहे. त्यांच्या रिजॉयस इव्हेंट ऑर्गनायझर ट्रॅव्हल्स कंपनीत गुंतवणूक केल्यास चांगला मोबदला मिळेल आणि कमिशन मिळेल अशी सांगितले. तसेच अनिल मित्तल यांनी फेब्रुवारी २००४ पासून त्या ट्रॅव्हल्स कंपनी व्यवसायात मोठी रक्कम गुंतवणूक केलेली आहे असेही सांगितले. जगताप याने अनुज मित्तल यांचे उदाहरण देवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. राहुल जगताप, एंजल जगताप आणि अनुज मित्तल यांनी एक महिन्याच्या कालावधीसाठी रक्कम गुंतवणूक करण्यास वारंवार सांगितले. त्यावरुन फिर्यादी यांनी राहुल जगताप यांनी दिलेल्या त्यांचे आईचे सुशीला दर्शन जगताप यांचे सानपाडा मुंबई येथील बँके चे करंट अकाउंटवर ९५ लाख रुपये पाठवले होते. जगताप पती–पत्नी यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करण्यासाठी त्या रकमेपैकी ७० लाख ३० हजार रुपये फिर्यादी यांना १ सप्टेंबर २०२४ ते २७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान गुंतवलेल्या रकमेचा मोबदला म्हणून परत केले.

त्यानंतर जगताप पती पत्नी यांनी उर्वरित रक्कम परत करण्यासाठी दिलेली एक महिन्याची मुदत संपून गेल्याने त्यांना फिर्यादी यांनी त्यांना मुद्दल येणे बाकी असलेली २४ लाख ७० हजार रुपये व कमिशनचे पैसे परत करण्यास सांगितले असता जगताप पती–पत्नी यांनी उडवा उडवीची उत्तरे देऊन वेळ काढूपणा केला त्यानंतर फिर्यादी यांनी वारंवार तगादा केल्याने जगताप यांनी सुशीला जगताप यांच्या बँक खात्याचे दोन चेक दिले. जगताप यांनी दिलेले चेक फिर्यादी यांनी बँकेत भरले असता ते चेक न वटता परत माघारी आले

दरम्यानच्या काळात भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात राहुल जगताप, एंजल जगताप व सुशीला जगताप यांच्या विरोधात २९ ऑक्टोबर २०२४ रोजी अनुज मित्तल आणि अंचल पवन कुमार अग्रवाल यांना देखील ३० लाख रुपयाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला. त्यावरुन फिर्यादी यांच्या लक्षात आले की जगताप कुटुंबीयांनी त्यांची देखील फसवणूक केली. याबाबत त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यासाठी फिर्यादी यांनी पोलीस अधीक्षक अ.नगर यांच्याकडे तक्रार दिला होता. त्याची चौकशी होवून १५ मे रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात योगी सबलोक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तिघांविरुद्ध बी एन एस ३१८ (४), ३१६ (२) ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक पूनम श्रीवास्तव या करीत आहेत.

# नगर जिल्ह्याच्या काही भागात १५ व १६ ते १८ मे रोजी पाऊस

नगर – जिल्ह्याच्या काही भागात १५ मे रोजी वीजांच्या कडकडाटासह वादळी वारा व गारपीट होण्याची शक्यता असून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच १६ ते १८ मे रोजी तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटांसह वादळी वारा व हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१– २३२३८४४ अथवा २३५६९४० यावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

कमी ऐकू येते का ?
त्वरीत संपर्क साधा 8380041240
* लंडन येथून उच्च शिक्षित ऑडिओलॉजिस्टकडून श्रवण क्षमता आणि श्रवण यंत्राबाबत मार्गदर्शन मिळवा.
* नैसर्गिक आवाजासाठी सर्वात अद्ययावत श्रवणयंत्र उपलब्ध.
* योग्य मार्गदर्शन आणि प्रथम श्रेणी श्रवण सहाय्य सेवांसाठी भेट द्या.
* चार्जेबल हेरिंग हेड उपलब्ध
* काना आतील सूक्ष्म श्रवण यंत्र उपलब्ध.
* सिप्रिया कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते
स्थापना : १९९२ साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल अँण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहिल्यानगर - 414003.
दुकान वेळ : सकाळी १० ते सायं. ७.००

MAHA DISCOUNT offer
Just in Any Course 1800/-
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१



### जातनिहाय जनगणना

सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचे ठरवले व वाचनात आलेल्या श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या पुस्तकातील एक उतारा आला तो येथे मुद्दाम देत आहे. ते म्हणतात–

''आपला समाज व्यक्तींचा बनला नसून जातींचा व पोटजातींचा बनलेला आहे. या जातींपैकी काही सुशिक्षित व सुसंस्कृत व काही बहुतांशी अशिक्षित आहे. पूर्वोक्त वर्गाच्या जाती आपापल्या हितास दक्षतेने जपू शकतात. पण उत्तरोक्त वर्गातील जातीस ते शक्य नसते. व्यक्तीस सज्ञान व आत्मसंयमी करणे सर्वस्वी नसले तरी बरेच साध्य असते पण सबंध समाजात ज्ञानाचा किंवा संयमनाचा प्रसार करणे अशक्य नसले तरी अत्यंत दुर्घट असते. नीच जातीत (आजचे बॅकवर्ड व आरक्षित) शिक्षणाचा प्रसार करणे अशक्यच नसले तरी अवघड आहे. (ही गोष्ट १०० वर्षापूर्वीची होती हे लक्षात ठेवावे) त्यामुळे त्या जातीत शिक्षणाचा प्रसार करण्याचे जारीचे प्रयत्न सुरू असताही त्याच्यात विशेष चेतन उत्पन्न होत नाही. तसेच उच्च जातीत या जातींकरता स्वार्थत्याग करण्याची बुद्धी उत्पन्न करण्याचे प्रयत्न थोर महात्म्यांकडून होत असताही त्यास यावे तसे यश येत नाही.''

गेल्या अनेक वर्षापासून देशातील जुन्या काँग्रेस पक्षापासून इतरांनीही हा मुद्दा लावून धरला होता. आता ही मागणी मान्य झाल्याने केवळ आरक्षण नव्हे तर देशात आदिवासी, ओबीसी, दलित किती आहेत? त्यांची भागीदारी कुठे, किती आहे? याची वास्तविक माहिती मिळू शकेल.

जातविरहित व राजकारणविरहित या महत्त्वाच्या मुद्याकडे पाहिले गेल्यास समाजव्यवस्थेचा आरसा दिसेल आणि त्यातूनच खरा भारत कळून योग्य प्रगती करता येईल अशी आशा आहे.

# मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी हिंदू समाज आक्रमक; रास्ता रोको आंदोलन करत कर्जत शहरामध्ये पाळला कडकडीत बंद

नगर – कर्जत येथील प्राचीन हनुमान मंदिर परिसरात झालेले अतिक्रमण हटविण्याच्या मागणी करिता सकल हिंदू समाजाच्या वतीने आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली १६ मे रोजी रास्ता रोको आंदोलन करुन कर्जत मध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. यावेळी भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर हे ही उपस्थित होते.

कर्जत येथील प्राचीन दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरात काही जिहादी लोकांनी केलेले अतिक्रमण काढण्यास प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने हिंदू समाज एकवटला. याबाबत जिल्हाधिकारी यांना रस्ता आंदोलनाचे निवेदन देऊन १६ मे रोजी कर्जत येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कर्जत तालुक्यातील हिंदू धर्मिय मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनानंतर प्रांताधिकाऱ्यांनी येथील शासकीय जागेवर झालेले अतिक्रमण लवकरच काढण्यात येईल असे आश्वासन दिले.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, या मंदिरात हिंदू बांधवांना दर्शनासाठी जाताना अडचणींना सामोरे जावे लागते. हिंदू देवतांच्या मंदिरावर झालेले अतिक्रमण सहन केले जाणार नाही. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य कारवाई त्वरित करावी. जर कारवाई करण्यास दिरंगाई झाल्यास हिंदू समाजाच्या वतीने मोठे आंदोलन उभारण्यात येईल असा इशाराही यावेळी आमदार जगताप यांनी दिला.

या रास्ता रोको आंदोलनास कर्जतकरांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा दाखवला तसेच कर्जत मध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. या आंदोलनादरम्यान आंदोलकांकडून कुठलाही अनुचित प्रकार घडला नसून बंद शांततेत पार पडला. यावेळी कर्जत मध्ये मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# प्रधानमंत्री घरकुल योजनेस मुदतवाढ देवून कामचुकार ग्रामसेवकांवर कारवाई व्हावी अन्यथा वंचित लाभार्थ्यांसह ‘आंदोलन’

नगर – प्रधानमंत्री घरकुल योजनेसाठी शासनाकडून अहिल्यानगर जिल्ह्यात ग्रामसेवकां मार्फत व सेल्फसर्व्हे करण्यात आला. या सर्व्हेची मुदत १५ मे २०२५ पर्यंत होती. परंतु ही योजना गावागावांमध्ये राबवत असताना, ग्रामसेवकांच्या कामकाजात दिरंगाई व हलगर्जीपणा दिसून आला. त्यामुळे स्वतःच्या मालकीच्या घरापासून वंचित असणाऱ्या गरजू लोकांपर्यंत ही योजना पोहोचलीच नाही. त्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे यांना सेल्फ सर्व्हे साठी मुदतवाढ व कामात हलगर्जीपणा करणाऱ्या ग्रामसेवकांवर कारवाईसाठी, शिवसेना (उबाठा) गटाचे युवासेना जिल्हा उपप्रमुख सोमनाथं कांडके यांनी निवेदन दिले.



प्रधानमंत्री घरकुल योजना मुदतवाढ व कामचुकार ग्रामसेवकांवर कारवाई व्हावी, या मागणीचे निवेदन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे यांना देताना शिवसेना (उबाठा) गटाचे युवासेना जिल्हा उपप्रमुख सोमनाथ कांडके.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक गरजू लाभार्थ्यांकडे स्वतःचे पक्के घर नाही. अशा अनेक लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा फायदा झाला असता. त्यासाठी ग्रामस्तरावर योजनेच्या माहितीसाठी ग्रामसेवकांनी व प्रशासनाने योग्य प्रचार–प्रसार करणे अपेक्षित होते. त्याचबरोबर काही लाभार्थ्यांचा सर्व्हे ग्रामसेवकांनी योग्य वेळेत करणे अपेक्षित होते. मात्र तसे न झाल्याने लाभार्थी स्वतःच्या हक्काच्या पक्क्या घरापासून वंचित राहणार आहेत. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांना सेल्फ सर्व्हे करताना उपलब्ध असणाऱ्या ॲप बाबत अडचणी येत आहेत. शिवाय फॉर्म मधील जॉबकार्डची अट देखील अडचणीची ठरत आहे. कारण अनेकांकडे जॉब कार्ड सध्या उपलब्ध नाही किंवा ते मुदतबाह्य झालेले आहेत. त्यामुळे युवासेनेच्या वतीने निवेदन देऊन, घरकुल योजनेत दिरंगाई करणाऱ्या ग्रामसेवकांवर योग्य कारवाई, सेल्फ सर्व्हेसाठी मुदतवाढ, तसेच जॉब कार्डची अट शिथिल करने यासाठी निवेदन देण्यात आले. संबंधित मागण्या मान्य न झाल्यास, वंचित लाभार्थ्यांसह जिल्हा परिषदेत आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला.

यावेळी युवासेना जिल्हा उपप्रमुख सोमनाथ कांडके, युवासेना तालुकाप्रमुख प्रवीण गोरे, संजय गांधी निराधार समिती सदस्य तथा ग्राम पंचायत सदस्य बाबासाहेब धीवर, महादेव दरंदले उपस्थित होते.

## महापालिकेतील अपहाराच्या गुन्ह्यातून डॉक्टर अनिल बोरगे यांचे नाव वगळले

(पान १ वरुन)

आरोग्य विभागाचे प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी याप्रकरणी फिर्याद दिलेली आहे. त्यानंतर दोघांना अटकही करण्यात आली होती.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी आरोग्य विभागाच्या संपूर्ण कामकाजाच्या चौकशीचे आदेश दिले होते. उपायुक्त विजयकुमार मुंडे मुख्य लेखा परीक्षक विशाल पवार व प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकर यांच्या समितीने चौकशी करून आयुक्तांकडे अहवाल सादर केला होता. यात शासकीय अभियानाच्या खात्यातून १५ लाख व १६ लाख ५० हजार रुपये रणदिवे यांच्या खात्यात वर्ग झाल्याचे आढळून आले तसेच १५ लाख रुपये टप्प्याटप्प्याने पुन्हा अभियानाच्या खात्यात वर्ग झाल्याचे आढळून आले मात्र १६ लाख ५० हजार रुपये अद्यापही खात्यात जमा झालेले नसल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले होते.

त्यानंतर डॉ.राजुरकर यांनी फिर्याद दिली. रणदिवे यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा वापर करून १५ व्या वित्त आयोगाकडून आलेला निधीतील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यातून ऑनलाईन प्रक्रियेव्दारे १६ लाख ५० हजार रुपये डॉ.अनिल बोरगे यांची मंजुरी घेऊन संगमताने कॅनरा बँकेच्या वैयक्तीक बँक खात्यात वर्ग केले. त्या निधीचा स्वतःच्या फायद्यासाठी उपयोग केला असल्याचे फिर्यादीत म्हटलेले आहे. दरम्यान, याप्रकरणी डॉ. बोरगे व रणदिवे यांची चौकशी करून गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. पुढे काही दिवसांनी डॉ.बोरगे यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला. या दरम्यानच्या कालावधीत आयुक्त डांगे यांनी डॉ.बोरगे यांना निलंबित केलेले आहे.

या गुन्ह्याची सखोल चौकशी केल्यावर पोलिसांना या गुन्ह्यात डॉ. बोरगे यांचा सहभाग आढळून आला नाही, त्यामुळे कोतवाली पोलिसांनी तसा अहवाल शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक अमोल भारती यांना पाठविला. या अहवालावरून पोलिस उपअधीक्षक भारती यांनी या गुन्ह्यात डॉ. बोरगे यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावाच नाही असे पत्र न्यायालयात सादर केले आहे. त्यामुळे डॉ. बोरगे यांना बीएनएसएस १८९ प्रमाणे गुन्ह्यातून वगळण्यात आले आहे.

## घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर – घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅण्डल लॉक करुन लावलेली बजाज कंपनीची पल्सर २२० मोटारसायकल (क्र. एम एच १६ ए. पी. ८६००) कोणीतरी अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरून नेली. ही घटना १२ मे रोजी रात्री ११ ते १३ मे रोजी सकाळी ६ वाजण्या च्या दरम्यान निर्मलनगर येथील भगवानबाबा चौक, सावेडी येथे घडली. याबाबत बाबासाहेब मंडू आव्हाड (वय ५३, रा. भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी. एन. एस. कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# गुणे आयुर्वेद रुग्णालयात १७ मे रोजी रक्तदान शिबीर

नगर – भारतात सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर रक्त साठा मुबलक ठेवणे गरजेचे आहे. तसेच उन्हाळा, लग्नसराई, परीक्षा यामुळे रक्तदान शिबिरांची संख्याही कमी झालेली आहे. अशा परीस्थितीत रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय व जनकल्याण रक्तकेंद्राच्या संयुक्त विद्यमाने १७ मे रोजी सकाळी १० ते १ या वेळेत गुणे आयुर्वेद रुग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्ता लोडे यांनी दिली.

रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी मोठ्या संख्येने दात्यांनी रक्तदान करावे असे आवाहन जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## लक्ष्मीकांत शेटीया यांचे हृदयविकाराने निधन

नगर – मार्केटयार्ड चौकातील पूनम मोतीनगर येथील रहिवासी लक्ष्मीकांत मिश्रीलाल शेटीया (वय ४८) यांचे १५ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर १६ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.

## खुशालचंद मुनोत यांचे अल्प आजाराने निधन

नगर – माणिक चौकातील रहिवासी व ‘आकाशवाणी’ या दुकानाचे संचालक खुशालचंद आनंदराम मुनोत (वय ८४) यांचे १५ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अजित, अतुल, अंजली व मंजू यांचे ते वडील होत.

## श्रीमती शोभाबाई भवार यांचे दीर्घ आजाराने निधन

नगर – कल्याण हायवे येथील रहिवासी श्रीमती शोभाबाई रामदास भवार (वय ७५) यांचे १५ मे रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, २ नातवंडे असा परिवार आहे. मनोज भवान यांच्या त्या मातोश्री होत दत्तात्रय माधव ससाणे यांच्या बहिण होत.

## छबुबाई शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – उक्कडगाव येथील रहिवासी छबुबाई रामभाऊ शिंदे (वय ८५) यांचे १५ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर उक्कडगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. नामदेवराव शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.



## बाबुलाल अब्बड यांचे वृद्धापकाळाने निधन

शेवगाव – मारवाडीगल्लीतील रहिवासी बाबुलाल अब्बड (वय ७५) यांचे १६ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर शेवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चंदन, राकेश अब्बड यांचे ते वडील होत.

## विषारी औषध घेवून वृद्धाची आत्महत्या

नगर – काही तरी विषारी औषध प्राशन करत वृद्ध व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील कौडगाव जांब येथे १४ मे रोजी रात्री घडली. नाथा म्हातारदेव अकोलकर (वय ८०, रा. करंजी, ता.पाथर्डी) असे मयताचे नाव आहे. मयत अकोलकर हे कौडगाव जांब येथे त्यांच्या मुलीच्या घरी आलेले होते. त्यांनी १४ मे रोजी रात्री १०.३० च्या सुमारास विषारी औषध प्राशन केले. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांची मुलगी अंबिका भास्कर पवार व इतरांनी खाजगी वाहनाने त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार चालू असताना १५ मे रोजी पहाटे १.१० वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. याबाबत जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.खराडे यांनी दिलेल्या अहवालावरून नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## विजेचा शॉक बसून शेतकऱ्याचा मृत्यू

नगर – शेतात काम करीत असताना विजेचा शॉक बसून शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील मांडवे येथे १५ मे रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडली. विनायक पिराजी मुंगसे (वय ५५, रा. मांडवे, ता.नगर) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. विनायक मुंगसे हे त्यांच्या शेतात काम करीत असताना त्यांना विजेचा शॉक बसून ते बेशुद्ध झाले, हे समजताच त्यांचा मुलगा प्रमोद विनायक निमसे याने त्यांना औषधोपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कोल्हे यांनी दिलेल्या माहितीवरुन नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मंगेश खरमाळे हे करीत आहेत.

# समाज कल्याण विभागाचा निधी इतर खात्यात वर्ग करू नये

### जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब केदारे यांची मागणी; राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

नगर – समाज कल्याण विभागाचा निधी हा मागासवर्गीय समाजाच्या विविध योजना राबवण्यासाठी व मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला असतो. हा निधी इतर खात्यात वर्ग न करता हा संपूर्ण निधी विविध योजनात वाटप करण्यात यावा, या मागणीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार व माधवराव गायकवाड, शांताराम कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, राज्य कार्यकारणी सदस्य कैलास गांगर्डे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, राज्य कार्यकारणी सदस्य शोभाताई कानडे, ज्ञानेश्वर मैसमाळे, गणेश गोरे आदी उपस्थित होते.



समाज कल्याण विभागाचा निधी इतर खात्यात वर्ग करू नये, या मागणीचे निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला निधी हा देखील पूर्णपणे नसतो. या वर्षातील बराच निधी गेल्या महिन्यापासून इतर योजनेसाठी इतर विभागाकडे वळवण्यात आलेला आहे. समाज कल्याण मंत्री यांच्या प्रसारमाध्यमातील वक्तव्यावरून निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाज कल्याण खात्यात अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनेवर त्यांचा विपरीत परिणाम होणार आहे तसेच समाज कल्याण मार्फत राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनेवर त्याचा दुरुपयोगी परिणाम होणार असून, समाज कल्याण खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी शिकणाऱ्या मुलांची बार्टीच्या मार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती, आश्रम शाळा निधी, विद्यार्थी प्रशिक्षण निधी तसेच मागासवर्गीयांचा विविध कर्ज योजना इत्यादींवर व मागासवर्गीय विभागाला म्हणजेच समाज कल्याण खात्याला निधी योग्य प्रमाणात दिला जात नाही व तोही वेळेवर मिळत नाही. तरी मागासवर्गीय समाजावर होणारा अन्याय दूर करून निधीचे वितरण पूर्ववत समाज कल्याण विभागाला करण्यात यावे व अशा प्रकारे समाज कल्याण खात्याचा निधी इतर खात्यात वळवण्याच्या घटना पुढे होऊ न देता याची दक्षता घेण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने लुटणाऱ्या टोळीतील ३ आरोपी जेरबंद

नगर – स्वस्तात सोने देण्याच्या आमिष दाखवत संगमनेर तालुक्यातील तरुणाला जामखेड तालुक्यातील कुसडगाव शिवारात बोलावून त्यास ११ लाखांना लुटणाऱ्या टोळीतील ३ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. सोन्या शिवाजी काळे (वय २८), अभित्या शिवाजी काळे (वय ३२, दोन्ही रा.सदफडोह, ता.करमाळा, जि.सोलापूर), शुभम रामचंद्र पवार (वय १८, रा.सरदवाडी, ता.जामखेड) अशी या आरोपींची नावे आहेत.



स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने तरुणाला लुटणाऱ्या टोळीतील तिघांना पकडल्या नंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

फिर्यादी राजेंद्र दिलीप मैड (वय ३५, रा.आश्वी, ता.संगमनेर) १४ मे रोजी कुसडगाव शिवारात ८ ते १० जणांनी लुटले होते. याबाबत जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच त्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, गणेश लोंढे, रोहित मिसाळ, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, अमोल कोतकर, बाळासाहेब गुंजाळ, रमीजराजा आत्तार, विशाल तनपुरे, मनोज लातुरकर, सुनिल मालणकर, मेघराज कोल्हे, उमाकांत गावडे, अरूण मोरे यांच्या पथकाने सुरु केला.

पथकाला १५ मे रोजी सदर गुन्हा विकास काज्या काळे, जरेणी विकास काळे (दोन्ही रा.पोंदवडी, ता.करमाळा, जि.सोलापूर), वनिता रामचंद्र पवार (रा.सरदवाडी, ता.जाम खेड), सोन्या शिवाजी काळे (रा.सदफडोह, ता.करमाळा) यांनी त्यांचे साथीदारासह केला असून ते जवळा, ता.जामखेड येथे येणार असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने जवळा येथे आरोपीतांचा शोध घेऊन सोन्या शिवाजी काळे, अभित्या शिवाजी काळे, शुभम रामचंद्र पवार या तिघांना पकडले.

पथकाने ताब्यातील आरोपींकडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी सदर गुन्हा विकास काज्या काळे, जरेणी विकास काळे, लालासाहेब काज्या काळे, किरण काज्या काळे (रा.पोंदवडी, ता.करमाळा), वनिता रामचंद्र पवार, दिक्षा रामचंद्र पवार (रा. सरदवाडी, ता.जामखेड), सुनिल शिवाजी काळे, रेश्मा सुनिल काळे (रा.सदफडोह, ता.करमाळा) अशांनी मिळून केला असल्याची माहिती सांगितली. ताब्यातील आरोपीस गुन्ह्याचे तपासकामी जामखेड पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

## शेतातून लोखंडी पोलची चोरी

नगर – शेत जमिनीत ठेवलेले ९ हजार रुपये किमतीचे वीस फूट लांबीचे तीन लोखंडी पोल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना नगर तालुक्यातील टाकळी काझी येथील येवले यांच्या शेत जमिनीत १२ मे रात्री ७ ते १३ मे रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली

याबाबत प्रशांत शिवाजी येवले (वय ३९, रा. सारसनगर अ.नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी. एन. एस. कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक मोहिनी कर्डक या करित आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आंब्याच्या रसावर टाका तूप

उन्हाळ्याच्या सिझन सुरु आहे. उन्हाळ्यामध्ये आंब्यावर ताव मारला जातो. पण काही जण आंब्याच्या रसावरती तूप टाकून खातात. आंब्याच्या रसामध्ये जर आपण तूप घालून खाल्लं तर त्याची चव अजून वाढते. तसंच ते पचायला देखील सोपे जाते. तसेच यामध्ये फॅटी ॲसिड असते आणि ते पचण्यासाठी मदत करते. पण तूप घालताना तुम्ही ते योग्य प्रमाणातच घालावे कारण तरच ते फायदेशीर ठरते. त्याचा अतिरेक हा करू नये. आंब्याच्या रसावर तूप टाकून खाणे योग्य आहे, कारण त्यामुळे चव वाढते आणि पचनास मदत होते. तूप आंब्याच्या रसाला फॅटी ॲसिड पुरवते, जे पचन प्रक्रियेत मदत करते.

## पाककला

### क्लब सॅण्डविच

**साहित्य :** १ उकडलेले बीट, ४ मध्यम आकाराचे उकडलेले बटाटे, १ मोठ्या ब्राऊन ब्रेडचे पाकीट, २ बारिक केलेल्या सिमला मिरची, बारीक केलेले गाजर, १ बारीक चिरलेला कांदा, १ आडवा चिरलेला कांदा, अमूल बटर, १ चमचा ओरिगानो, २ चमचे मायोनीज, २ टोमॅटो आडवे चिरलेले, १ चमचा चिली फ्लेक्स, चवीनुसार मीठ, चवीनुसार चाट मसाला, शेजवान चटणी, २ बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, चिमूटभर लाल तिखट, ४ चीज स्लाईस, १ उकडलेले बारीक चिरलेले बिट

**कृती :** प्रथम वरील बारीक चिरलेल्या भाज्या चवीनुसार मीठ, चाट मसाला, चिली फ्लेक्स, ओरिगानो, मायोनिज, बारीक चिरलेली हिरवी मिरची एका कढईत घेऊन सर्व मिक्स करावे व चांगले ढवळावे. नंतर एका ब्रेडला शेजवान चटणी लावावी मग त्यावर वरील मिश्रण एक चमचा टाकावे नंतर त्यात वरती दुसरा ब्रेड ठेवावा व त्यावर टोमॅटो केचअप लावून त्यावर आडवा कांदा, बटाटा, टोमॅटो ठेवावे, चीज स्लाईड ठेवावे. तिसऱ्या ब्रेडला मायोनीज लावून ठेवावे. नॉनस्टीक तव्यावर बटर लावून मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सँडविच शेकून घ्यावे. क्लब सॅण्डविच झाले तयार आहे.

## वास्तू

### फर्निचर संबंधी

पिंपळ, चंदन सनातन धर्मात पूज्य मानले जाते. म्हणून हे लक्षात ठेवा की, आसपास या झाडांनी बनविलेले फर्निचर कधीही घरात ठेवू नका, असे केल्याने तुम्हाला नकारात्मक परिणाम मिळतात. पिंपळ आणि वटवृक्ष हे देवी-देवतांचे निवासस्थान आहे म्हणून त्यांना कापून, फर्निचर बनवल्याने देवी-देवता संतप्त होतात व बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते असे मानले जाते.

## सल्ला

पाय धुतल्याने शरीर थंड होते आणि मसाजमुळे झोप पटकन लागते.

## सौंदर्य

* लिपस्टिक बराच वेळ राहू देवू नये. यामुळे ओठ काळे पडतात. रात्री झोपण्याच्या अगोदर लिपस्टिक काढायला हवी.

* रात्री झोपण्यापूर्वी ओठांवर नारळ तेल लावा. यामुळे ओठ मऊ आणि हायड्रेटेड राहतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. १७ मे २०२५

**--, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, पू.षा.१७।४४, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. .

**वृषभ :** व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळाल.

**मिथुन :** हितशत्रू त्रास देतील. दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील.

**कर्क :** काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. आनंदाची बातमी मिळेल.

**सिंह :** दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखदायक राहील.

**कन्या :** मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही.

**तूळ :** आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक :** आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते. आरोग्य देखील उत्तम राहील.

**धनु :** रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. महत्त्वाचा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

**मकर :** शत्रूवर्ग निष्प्रभावी राहील. श्रम अधिक झाल्यामुळे दमल्यासारखे वाटेल. किरकोळ वाहन अपघात होईल.

**कुंभ :** एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबरोबर आपले सामंजस्य वाढेल. विश्रांतीसाठी किंचित वेळ काढाल.

**मीन :** सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७१७८

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | ८ | ■ | ९ | | १० | |
| ■ | ११ | | | | ■ | १२ | |
| १३ | | | ■ | १४ | १५ | | ■ |
| | ■ | ■ | १६ | ■ | | ■ | १७ |
| १८ | १९ | | | ■ | २० | २१ | |
| ■ | | ■ | | ■ | २२ | | |
| २३ | | ■ | २४ | | | ■ | ■ |

**आडवे शब्द :-** १) घन; ढग; आभाळ ३) मान्य; आवडलेले ७) खोदणे; खंदणे ९) श्रम; परिश्रम; कष्ट ११) जंगलाला लागलेली आग; वणवा १२) गळ्याची मागची बाजू; आदर १३) पायताण; वहाण १४) मुस्लीम पुरुषाचे एक नाव १८) दुरुस्ती २०) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी २२) ज्ञात; जाणलेले २३) एक आंबट पालेभाजी २४) वंदन; प्रणाम; सुरुवात; आरंभ

**उभे शब्द :-** १) जनावर जिला दोरीने बांधतात ती जमिनीत मारलेली खुंटी २) अतिशय गर्द (जंगल) ४) मेळावा; मेळा ५) समेट; सलोखा; साम ६) पगार; पेमेंट ८) पलंग विणण्याची कापडी पट्टी १०) मुस्लिमांची प्रार्थना १३) अनेक पाय असलेला पाणथळ जागी राहणारा एक जीव १५) किराणा दुकानातून आणलेल्या वस्तू १६) मरेपर्यंत; जीव असेपर्यंत १७) एक धातू; रुपे; चांदी १९) गोंधळ; गलबला; गडबड २१) लेखणीने ज्यावर लिहिले जाते ते कागदांचे टाचण; चोपडी

### शब्दगंध क्र. ७१७७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | डा | ज | ■ | द | ब | द | बा |
| ज | र | त | र | ■ | न | र | क्ष |
| नी | ■ | न | स | ■ | दा | ■ | ■ |
| सु | ख | ■ | द | म | द | मा | ट |
| ल | ह | क | ■ | ■ | ■ | ■ | व |
| ■ | खु | ल | क | ■ | ओ | म | ट |
| ■ | डा | क | ■ | द | ■ | क | की |
| अ | ट | ल | बि | हा | री | ■ | त |

### फिल्मीचक्कर क्र. ११८८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व | हि | दा | र | हे | मा | न | ■ |
| ■ | म्म | ■ | ■ | मा | ■ | ग | ■ |
| व | त | न | ■ | मा | ला | मा | ल |
| ■ | वा | ■ | ■ | लि | ■ | ■ | ल |
| स | ला | म | ■ | नी | ल | ■ | का |
| ली | ■ | क | ब | ■ | ■ | चो | र |
| म | ■ | स | ■ | ■ | ■ | र | ■ |
| ■ | म | द | र | ■ | सु | नी | ल |

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जीवन हा एक अविरत प्रवास आहे, ज्यात प्रत्येक वळण हे नवीन शिकवण आणि अनुभवाची संधी देते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### वाहनांचे टायर नेहमी काळ्या रंगाचे का असतात?

कारचे टायर देखील रंगीत केले जाऊ शकतात. परंतु सामान्यतः कार्बन ब्लॅकचा वापर टायर कंपाऊंड बनवण्यासाठी केला जातो जो पूर्णपणे काळा असतो. काळेपणा दूर करण्यासाठी आणि टायरला रंगीत करण्यासाठी, काही प्रकारचे रंगद्रव्य वापरावे लागेल ज्यामुळे टायरच्या उत्पादनाचा खर्च वाढेल आणि बाजारात टायर खूप महाग होईल.

दुसरी गोष्ट अशी असू शकते की टायर ज्या वाहनात बसवले असतील त्या रंगाचे बनवावे लागतील. यामुळे, टायर कंपनी आणि वाहन विक्रेत्याला टायर्सचा मोठा साठा ठेवावा लागेल, जो एक महागडा व्यवहार असेल कारण त्यासाठी पुरेशी जागा व्यवस्था करावी लागेल.

तिसरे कारण म्हणजे टायर रस्त्यावर चिखल आणि मातीत चालत असल्याने, रंगीत टायरवर धूळ आणि घाण जमा झाल्यावर त्याचा रंग फिकट दिसेल, ज्यामुळे त्याचे सौंदर्य कमी होईल. म्हणूनच टायर सामान्यतः काळे असतात. काळ्या रंगाच्या टायर्समध्ये 'रबर' नावाचा एक विशेष पदार्थ असतो. हे रबर रस्त्यावर वाहनाला स्थिरता प्रदान करण्यास मदत करते, विशेषतः जेव्हा रस्ता ओला असतो किंवा वाहन पाण्यात किंवा चिखलाच्या ठिकाणी चालवले जाते. याव्यतिरिक्त, काळे टायर जास्त सूर्यकिरण शोषून घेतात, ज्याने टायरचे आयुष्य वाढते आणि वाहनाची सुरक्षितता देखील वाढते. कारच्या टायर्सचा काळा रंग हा ते बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांच्या मिश्रणामुळे आणि कालांतराने वाहून जाणाऱ्या कार्बन ब्लॅकमुळे असतो. यामुळे टायर्सना काळसर रंग येतो आणि त्याची अनेक कारणे असू शकतात:

### स्वनाश

एक भुकेलेला डोमकावळा भक्ष्याच्या शोधात असता, नदीकाठी बसलेला एक साप त्याने पाहिला. मग त्याने झडप घालून त्यास आपल्या चोचीत धरले आणि आता मारून खाणार, तोच त्या सापाने त्याच्या अंगाभोवती वेढे घालून आणि त्याच्या मानेस दंश करून त्याचा तत्काळ प्राण घेतला.

मरतेवेळी तो डोमकावळा म्हणाला, 'दुसऱ्यास मारून स्वतःची क्षुधा शांत करू इच्छिणारास हे पारिपत्य सर्वस्वी योग्य आहे.'

तात्पर्य : जो पदार्थ आपणास मिळविता येणे शक्य नाही आणि मिळाला तरी पचन होणे शक्य नाही, तो पदार्थ अधाशीपणाने खाऊन जाणे म्हणजे स्वतःचा नाश करून घेणे होय.

## रहमते दर्शन (भाग - १)



लक्ष्मी ने अपने पति को पत्र तो नहीं लिखा, किन्तु मन ही मन कामना की, कितना अच्छा हो, यदि वे दिल्ली आ जायें और मैं उन्हें महाराज जी के पास ले चलूँ ताकि मेरे कष्टों का निवारण हो जाये । अब यह चमत्कार ही कहा जायेगा कि तीन-चार दिन बार ही, लक्ष्मी के पति (श्री जागेश्वर सिंह ) दिल्ली आ गये । लक्ष्मी को तो जैसे खुशी का खजाना मिल गया। वह कहने लगी, मैं और सब बात बाद में सुनूँगी। पहले मेरे साथ महाराज जी के पास आश्रम चलो। और देखिये, वह व्यक्ति, जिसको सत्संग की पुस्तकों से भी चिड़ थी, वही आश्रम के लिए चल पड़ा और महाराज जी के समक्ष पेश हुआ। लक्ष्मी ने महाराज जी को अर्ज की, ये आ गये हैं । दयाल पुरुष महाराज दर्शनसिंह जी ने लक्ष्मी के पति को देखकर, उसको बड़े प्यार से समझाया और कहा, मेरी आँखों में आँखें डालकर देखो। उसने महाराज जी की आँखों में देखा। फिर

### उनके वचन रामबाण थे

महाराज जी ने उसको कहा, 'अब आगे ऐसी गलती मत करना ।

बस इतना होने के बाद लक्ष्मी का पति उससे कहने लगा, भई, हम तो राक्षस लोग थे । तुमने पहले क्यों नहीं बताया कि जगह आती हो। मुझे तो अब ऐसा लग रहा है जैसे मेरे सिर पर से तुम ऐसी बहुत भारी-भरकम बोझ उतर गया हो और अब मैं बहुत हल्का अनुभव कर रहा हूँ । इसके बाद उसने मद्य-पान और समिष भोजन का त्याग कर दिया ।

### उनकी अपार दया

मेरी पड़ोसन का, जो सत्संगी नहीं थी, १४ वर्षीय लड़का कई महीनों से घर से लापता था। उसकी माँ हर समय रोती थी । सब जगह पूछताछ की, मगर लड़के का कोई अता-पता नहीं लगा ।

एक दिन मैंने अपनी पड़ोसन को बताया कि रविवार के दिन तुम मेरे साथ सत्संग में चलना और हमारे महाराज जी को अपनी व्यथा कहना । वह मान गई और मेरे साथ रविवार को सत्संग में कृपाल आश्रम चली आई। उस दिन उसने महाराज दर्शनसिंह जी का सत्संग सुना । सत्संग के पश्चात महाराज जी संगत को दर्शन देने आये । मेरी पड़ोसन् ने महाराज जी से बात करनी चाही, मगर भीड़ के कारण बात नहीं हो पाई। महाराज जी जब दर्शन देकर वापिस जा रहे थे, तो वह भाग कर महाराज जी के रास्ते में आकर खड़ी हो गई। सेवादारों ने उसे हटाना चाहा, मगर महाराज जी ने उन्हें रोककर उस बीबी को कहा, बहन जी आपका लड़का गुम हो गया है? चिंता न करो, वह वापिस घर जाने पर तुम्हें घर में ही मिलेगा या शाम तक वापिस घर आ जायेगा ।

जब वह स्त्री घर पहुँची तो देखकर आश्चर्यचकित रह गई क्योंकि जो लड़का कई महीनो से लापता था, वह घर वापिस लौट आया था । सच है, महाराज जी सबके थे, नामलेवा या बिना नामलेवा ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अंगों में पहुचाना, पसीने व यूरिन के द्वारा गंदगी को बाहर निकालना इस चक्र का कार्य है।

ऊपर उड़ना -

विश्व का प्रतेक जीव ऊपर उठना चाहता है। कीड़े पेड़ पर चढ़ना चाहते हैं, चिड़ियां आकाश में उड़ना चाहती हैं, प्रत्येक व्यक्ति किसी न किसी क्षेत्र में उंचा उठना चाहता है। यह इच्छा अनाहत चक्र के कारण पैदा होती है।

थाइमस ग्रथि - ये चक्र थाइमस ग्रंथि को नियंत्रित करता है। यह ग्रंथि हृदय के करीब होती है और इसका सम्बन्ध अनाहतचक्र से होता है। इस ग्रंथि के समानुपातिक रस स्त्राव से शरीर की रोग निवारण क्षमता बढ़ जाती है। व्यक्ति को रोग से मुक्त होने में अधिक बल मिलता है। नकारात्मक चिंतन से हृदय दाह का रोग हो जाता है और जब यह ग्रंथि कमजोर हो जाती है तो इससे शरीर की सम्पूर्ण प्रतिरक्षात्मक व्यवस्था बिगड़ जाती है। भुजंग मुद्रा और प्राणयाम से अनाहत चक्र मजबूत होता है और शरीर के उपरी भाग से रोग दूर होते है।

जब आप डरे हुए, घबराए हुए या कुंठित होते हैं, तो आपकी हृदय की लय अस्थिर और

### अनाहत चक्र

अनियमित हो जाती हैं। लेकिन जब आप प्रेम को अनुभव करते हैं, सराहे गए महसूस करते हैं या किसी चीज के सृजन में वयस्त होते हैं, तो आपके हृदय की लय बिल्कुल ही अलग तरह की होती है। यह ज्यादा शांत और हल्की होती है। वैज्ञानिक इसे हृदय की सामंजस्यता कहते हैं।

हरी चीजें

इस चक्र को सक्रिय करने के लिए हरे रंग की सब्जियां, हरे फलों का सेवन करना चाहिए। आहार में पालक, ब्रोकली, गोभी, मटर, तोरी और हरी मिर्च जैसी सब्जियां खानी चाहिए। हरे फलों में हरा सेब, कीवी, अमरुद, हरा नीबूं मदद करेगा। ग्रीन चाय या ग्रीन खाने योग्य पत्तियों का सूप भी पी सकते हैं। आप तुलसी, अजवायन, मेहंदी और अजवायन के फूल का इस्तेमाल भी कर सकते हैं। दिन की शुरुवात हरी चीजो के खाने से कर सकते हैं। कल्पना या हकीकत में हरे पोधे और हरे पेड़ो में बैठ कर ध्यान लगाने से हमें पेड़ो की विद्युत भी मिलती है जिस से अनाहत चक्र संतुलित हो जाता है।

गोमुखासन या गरुड़ की मुद्रा को मन में देखने से अथवा गोमुखासन में बैठने से अनाहत चक्र खुलता है।

हृदय पर हरे रंग का फूल देखें या हृदय पर बिंदु देखें या इष्ट को देखें और भगवान के गुणों का सिमरण करें भगवान आप प्यार के सागर हैं, प्यार के सागर हैं। ऐसा करने से यह चक्र खुलता है।

हीरे तथा क्रिस्टल भी इस चक्र पर प्रभाव डालते हैं। परन्तु इन्हें धारण करने से पहले किसी हीरे या क्रिस्टल विद्वान से राय ले लें। नालगिरी, देवदार (पचौली की लकड़ी) की सुगंध भी इस चक्र को प्रभावित करती है।

हृदय चक्र के लिए हरे सेब, हरे नीबू, हरी ककड़ी (तर) आदि बहुत लाभदायक हैं।

कबूतर की आवाज का अनाहत चक्र पर प्रभाव पड़ता है। सारे

विश्व के कबूतरों को मन में देखें और बीच में भगवान को देखें और कबूतरों की आवाज मन में सुनते रहें। इस से ये चक्र जागृत हो जाएगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

स्थळ : लक्ष्मी रोड, पुणे काकांनी मिठाईचे दुकान उघडले
आणि जाहिरात दिली... कामगार पाहिजे -
पात्रता - मधुमेह असला पाहिजे

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आशिया खंडातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश?

– चिन

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

* कर्णवेधन संस्कार - बाळ सव्वा महिन्याचे झाल्यानंतर शुभदिवशी कान टोचले जातात. मुलगा असल्यास पहिल्यांदा उजवा कान व मुलगी असल्यास पहिल्यांदा डावा कान टोचवावा. यालाच कर्णवेधन संस्कार म्हणतात. यामुळे बाळामध्ये व्याधिसमत्व निर्माण होते.

* मुंडण संस्कार - जन्मानंतर काही महिन्यांनी शुभदिवशी बाळाचे जावळ काढतात, यालाच मुंडण संस्कार म्हणतात.

* उपनयन संस्कार - या उपनयन संस्कारालाच मुंज करणे असे म्हणतात. उपनयनचा अर्थ जवळ घेऊन जाणे. हा संस्कार वयाच्या आठव्या वर्षी केला जातो. बालक आध्यात्मिक जीवनात प्रवेश करतो, म्हणून त्याचा दुसरा जन्म मानला जातो. शुभदिवशी अन्नदेवता, ब्राह्मण व वैद्य यांचे पूजन करावे व अग्निकुंडामध्ये दही, मध, साजूक तूप यांची आहुती द्यावी व ॐ भूः भवः स्वाहा या ॐकाराचा विधिपूर्वक जप करून घृताची आहुती देत राहावी

वेदारंभ संस्कार - बालकाचे वय शिक्षणाच्या योग्य झाल्यानंतर गुरू किंवा पित्याकडून हा संस्कार केला जातो. आपले बालक वयाच्या चौथ्या व

### डॉक्टर, मला बाळ हवंय!

पाचव्या वर्षी ज्ञानार्जनासाठी जेव्हा शाळेत जाईल, त्या शुभदिवशी वेदारंभ संस्कार करावा. बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी त्याला धर्म व सदाचार यांचे व्यापक शिक्षण दिले गेले पाहिजे, की ज्यामुळे तो यौवनावस्थेत वासनेला बळी न पडता त्यावर मात करण्याची शक्ती मिळवेल.

समावर्तन संस्कार - शिक्षण संपल्यानंतर ज्ञानार्जन प्राप्त करून परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाल्यावर आपल्या गुरुंकडून आशीर्वाद घेऊन गुरुकुलाचा म्हणजेच आताच्या काळात कॉलेजचा निरोप घेण्याच्या क्रियेला समावर्तन संस्कार म्हणतात.

विवाह संस्कार - योग्य वय असलेले स्त्री व पुरुष आयुष्यभर एकमेकांची साथ देण्यासाठी व अपत्यजन्माच्या हेतूने एकत्र येतात, एकमेकांशी बांधले जातात. यालाच विवाह संस्कार म्हणतात. विवाह संस्कारामधून गृहस्थाश्रमाची सुरुवात होते. पुरुषाचे विवाह करते वेळी वय कमीत कमी २५ वर्षे असावे व तो शक्तिसंपन्न असावा आणि स्त्रीचे वय कमीत कमी १८ वर्षांचे किंवा त्याहून अधिक असावे. स्त्री व पुरुष यांचे गोत्र समान नसावे. स्त्री रूपसंपन्न, चारित्र्यवान असावी. तसेच पमपटेखील शक्तिसंपन्न व चारित्र्यवान असावा.

**१) हार्मोन्समधील असंतुलन -**

**२) प्रजननसंस्थेतील विकृती -** १) हार्मोन्समधील असंतुलन : यालाच संप्रेरके असे म्हणतात. आपल्या शरीरामध्ये अकरा अंत:स्रावी ग्रंथी असतात. त्या ग्रंथी अंत:स्राव तयार करतात. यालाच हार्मोन्स किंवा संप्रेरके असे म्हणतात. शारीरिक, मानसिक वाढीसाठी व प्रजननसंस्थेच्या वाढीसाठी स्त्री व पुरुषांमध्ये या हार्मोन्सचे प्रमाण प्राकृत असणे आवश्यक असते. स्त्रियांमध्ये विशेषत: पिट्युटरी आणि ओव्हरीचे महत्त्व जास्त आहे; तर पुरुषांमध्ये पिट्युटरी व टेस्टीजचे महत्त्व जास्त असते. स्त्रियांची मासिक पाळी वेळेवर येणे, बीजनिर्मिती होणे, बीज तयार होऊन फुटणे, गर्भाची वाढ होणे हे सर्व हार्मोन्सच्या प्रमाणावर अवलंबून असते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर जिल्ह्यात ऊसतोड व घरकामगारांची नोंदणी विशेष शिबिरांद्वारे मोहीम स्तरावर करावी

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

नगर – ऊसतोड व घरकामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा व त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडावा, यासाठी जिल्ह्यात विशेष शिबिरांचे आयोजन करून मोहीमस्तरावर नोंदणी करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.



शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आयोजित आढावा बैठकीत बोलताना महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे.

शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले आदी उपस्थित होते.

उपसभापती श्रीमती गोऱ्हे म्हणाल्या, जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना शैक्षणिक सुविधा, सामाजिक सुरक्षा योजना इत्यादींचा लाभ मिळावा, यासाठी नोंदणी शीघ्रगतीने पूर्ण करण्यात यावी. कामगारांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करावीत. कामगारांचा आरोग्य विमा व अपघात संरक्षण विमा काढण्यासाठी पुढाकार घेण्यात यावा. यासाठी प्रस्ताव तयार करून तो सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हा वार्षिक योजनेसाठी मंजूर निधीतून ३ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी राखीव असतो. या निधीचा उपयोग महिलांवरील अत्याचार प्रतिबंधक उपाययोजनांसाठी करावा. पीडित महिलांना 'मनोधैर्य' योजनेतून मदत केली जाते. परंतु अत्याचार घडल्यास तातडीची मदत या निधीतून करण्यात यावी.


बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांचा तपास गंभीरपणे व संवेदनशीलतेने व्हावा, यासाठी जिल्ह्यात बालस्नेही पोलीस ठाण्यांची आवश्यकता आहे. जिल्ह्यात पाच ठिकाणी बालस्नेही पोलीस ठाण्यांच्या उभारणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा. जिल्ह्यातील भरोसा सेलचे सक्षमीकरण करावे. ज्या ठिकाणी भरोसा सेल उपलब्ध नाही, अशा ठिकाणी ऑनलाईन भरोसा सेल तातडीने कार्यान्वित करावेत. भरोसा सेलमध्ये कार्यरत असलेल्या महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे, तर मानवी दृष्टिकोनातून सेवा देता यावी, यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. गृहभेटीद्वारे पीडित महिलांचे समुपदेशन करण्यात यावे.

अँटी रॅगिंग सेलविषयीची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, यासाठी शाळा व महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांशी बैठक घेऊन संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. अंमली पदार्थविरोधी जागृती कार्यक्रमही राबवावा. सखी सावित्री समितीसाठी एक निश्चित कार्यपद्धती आखावी. याचा लाभ अहिल्यानगर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांनाही होईल. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. त्या अनुषंगाने 'समाधान शिबिरांचे' आयोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात अनेक धार्मिक व इतर पर्यटनस्थळे असून, त्या ठिकाणी सातत्याने पर्यटक भेट देतात. पर्यटकांच्या समस्या नोंदविण्यासाठी मदत सेवा केंद्र सुरू करण्यात यावे. यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. जिल्ह्यात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित होणाऱ्या लोकशाही दिनामध्ये महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र वेळ राखीव ठेवून तक्रारींचे निवारण करण्यात यावे.वीज पडून होणाऱ्या मनुष्य व वित्त हानीला प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यात वीज अपघात प्रतिबंधक यंत्रणा कार्यान्वित करावी, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यातील विविध कामांची माहिती दिली.

# अहिल्यानगरमध्ये ग्राहक आयोगात प्रथमच मध्यस्थांमार्फत यशस्वी तडजोड



ॲड. सुनिल मुंदडा

नगर – नवनागापुर येथील शालिनी पवार उर्फ लाखे यांनी आय.सी.सी.आय. बँकेकडुन सन २००५ मध्ये गृहकर्ज घेतले होते. त्याची मुदत करारनाम्याप्रमाणे सन २०१७ चे अखेर पावेतो होती. शालिनी पवार यांनी ठरल्याप्रमाणे सर्व मासिक हप्ते जमा करुनही बँकेने वेळोवेळी झालेल्या कर्जाच्या व्याजातील वाढीमुळे जादा रकमेची मागणी करुन बेबाक दाखला देण्याचे नाकारले आणि यापुढे सन २०३४ पावेतो मासिक हप्त्याने परतफेड करावयाचे सुचवले. या तक्रारीचे निराकरण व्हावे म्हणुन ग्राहक आयोगामध्ये सन २०२० मध्ये तक्रार दाखल केली होती. दरम्यान ग्राहक संरक्षण कायदा सन २०१९ मधील तरतुदीनुसार अहिल्यानगर येथे मध्यस्थांचे पॅनल नियुक्त करण्यात आले. उभय पक्षकाराच्या विनंतीनुसार ग्राहक आयोगाने ॲड. सुनिल मुंदडा यांची मध्यस्थ म्हणुन नेमणुक केली व कार्यालयाने विनामोबदला मध्यस्थी करण्याची विनंतीपत्र दिले. त्यानुसार अर्जदार आणि बँकेचे अधिकारी याच्या वकीलांसमवेत सहा महिन्यापासुन अनेक बैठका झाल्या आणि मध्यस्थांनी अर्जदाराच्या तक्रारीबाबत सहानुभुतीने विचार करुन समेट घडवावी अशी दोघांना विनंती केली. सदरील वादविषयाबाबत सकारात्मक चर्चा होऊन प्रकरणामध्ये यशस्वी तडजोड झाली. त्यानुसार श्रीमती पवार यांनी यापुढे कर्जाची कोणतीही रक्कम भरावयाची नाही आणि बँकेने सदरील कर्जाबाबत बेबाक दाखला (निल सर्टिफिकेट) व गहाणखतासह सर्व मुळ कागदपत्रे परत द्यावी असे ठरले. बँकेने देखील ग्राहकाकडुन भविष्यात येणे असलेली सर्व रक्कम सोडून दिलेली आहे आणि अर्जदाराने देखील तक्रार अर्ज काढुन घ्यावयाचे कबुल केले आहे. याप्रमाणे झालेली तडजोड उभय पक्षकारांना मान्य असल्यामुळे तसा मध्यस्थी अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला व प्रकरण संपुष्टात आले.

अशाप्रकारे ग्राहक न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये देखील मध्यस्थांमार्फत तडजोड होऊन न्याय मिळू शकतो. याबाबत ग्राहकांनी सकारात्मक भुमिका घेतल्यास त्यांना जलद गतीने न्याय मिळणे सहज शक्य आहे. अहमदनगर ग्राहक आयोगामध्ये स्थापनेनंतर प्रथम मध्यस्थांमार्फत तक्रारीचे निवारण झाले. त्यामुळे पिडीत ग्राहकास न्याय मिळाला आणि मध्यस्थी प्रक्रियेचा लाभ सर्वसामान्यांना मिळू शकतो असा संदेश सर्व जनतेला मिळालेला आहे.

अहिल्यानगर येथे जिल्हास्तरावर ग्राहक आयोगाची स्थापना झाल्यानंतर प्रथमच एका प्रकरणामध्ये ॲड. सुनिल बी. मुंदडा यांनी प्रयत्न करुन तडजोड घडवुन आणली व तक्रार संपवली याबाबत सर्व वकील वर्ग व ग्राहकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष श्रीमती प्रज्ञा हेंद्रे, सदस्या श्रीमती चारु डोंगरे व सदस्या श्रीमती संध्या कसबे, ग्राहक आयोगाचे प्रबंधक व कर्मचारी यांनी तसेच ग्राहक संघटना व वकीलांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'रिहॅब सेंटर'मध्ये १९ मे रोजी फिजिओथेरपी, कायरोप्रॅक्टीक, ऑस्टिओपॅथी मोफत शिबीर

नगर – अहमदनगर रिहॅब सेंटर व रिक्युअर क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने १९ मे रोजी सावेडी, नोबल हॉस्पिटल शेजारी प्रेमदान चौकातील अहमदनगर रिहॅब सेंटर मध्ये फिजिओथेरपी, कायरोप्रॅक्टीक, ऑस्टिओपॅथी मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरामध्ये पाठ दुखी, मान दुखी, मनक्याचे आजार गुडघ्याचे आजार, वेदना व्यवस्थापन आणि पुनर्वसन यावर मोफत मार्गदर्शन करून उपचारावर ५०% सूट दिली जाणार आहे, अशी माहिती सेंटरचे डॉ. किशन गोपाल राजपूत यांनी दिली.

अधिक माहितीसाठी ९१७६६६२९२०९७/ +९१ २४१ ३५८ ७७४६.

# अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवामुळे नगरचा गौरव वाढणार

## उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन

नगर – अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवामुळे नगरची वेगळी ओळख निर्माण होणार आहे. या महोत्सवाचे आयोजन करून विचार भारती व जनसेवा फाउंडेशनने उत्कृष्ट काम केले आहे. आपल्या ऐतिहासिक नगरचा गौरव खऱ्या अर्थाने वाढवणाऱ्या या महोत्सवात नागरकरांनी सहभागी व्हावे हा महोत्सव यशस्वी करावा, असे आवाहन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

२९, ३० व ३१ मे रोजी अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याच्या नियोजनाच्या बैठकीत नरेंद्र फिरोदिया बोलत होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक रवींद्र मुळे, जनसेवा फाउंडेशनच्या धनश्री वीखे, विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे, उपाध्यक्ष अनिल मोहिते, महोत्सवाचे कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे, गौतम मुनोत, फाउंडेशनचे सदस्य निखिल वारे व धनंजय जाधव उपस्थित होते.



अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या बैठकीत बोलताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया.

रवींद्र मुळे म्हणाले, नगर कधी सुधारणार नाही, असे कायम म्हंटले जाते. हे चित्र बदलायचे असेलतर केवळ रस्ते, पूल, कारखाने अशी विकास कामे होऊन चालणार नाही. जेव्हा नगरप्रती प्रत्येकाला व नव्या पिढीचा अभिमान वाटेल तेव्हाच नगरच्या प्रगतीला सुरूवात होणार आहे. आपले नगर पुरातन काळापासून किती संपन्न, वैभवशाली, संस्कृती युक्त व संतांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेले सनातन आहे हे जेव्हा प्रत्येकापर्यंत जाईल तेव्हाच नगरप्रती अभिमान वाढणार आहे. आता आपल्या नगरचे नामांतर अहिल्यानगर झाले आहे. हे एकप्रकारे परिवर्तनच आहे. नगर शहराची व जिल्ह्याची स्थापना एका राजने केली नसून ते पुरातन काळापासूनची आहे. नगरची जुनी परंपरा, संकृती व खरा इतिहास नागरिकांपर्यंत आणणे आवश्यक यासाठीच अहिल्यानगर गौरवदिन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले आहे.

अनिल मोहिते यांनी तीन दिवस होणाऱ्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती देऊन २० मे रोजी अहिल्यानगर गौरव गीताचे प्रकाशन व पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या लोगोचे अनावरण सिने अभिनेते प्रवीण तरडे व मिलिंद शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

गौतम मुनोत म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या नावने होणाऱ्या या महोत्सवात आपण सहभागी होणार असल्याने आपण भाग्यवान आहोत.

यावेळी निखील वारे यांनी यानिमित्त आयोजित लकी ड्रॉ व खेळ पैठणीचा याबद्दल माहिती दिली. भारत भारतीचे कमलेश भंडारी, सिए शाखेचे अध्यक्ष प्रसाद पुराणिक, सिए ज्ञानेश्वर काळे, जितेंद्र बिहाणी, मनोज झंवर, ज्ञानेश शिंदे, गिरीराज जाधव, रवींद्र बारस्कर आदींनी चर्चेत भाग घेत सूचना केल्या. बैठकीचे सूत्रसंचालन विशारद पेटकर यांनी केले, राजेंद्र पाचे यांनी आभार मानले.

# विठोबा चौधरी गुरुजींच्या ९१व्या वाढदिवसानिमित्त माता-पिता पूजन व ज्ञानेश्वरी ग्रंथ तुला

नगर – पारनेर तालुक्यातील ढवळपुरी गावात समाजाला दिशा देणाऱ्या आणि संस्कारांचे बीज पेरणाऱ्या विठोबा हरि चौधरी गुरुजी यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त चौधरी कुटुंबाच्या वतीने कार्यक्रमात माता-पिता पूजन, ज्ञानेश्वरी ग्रंथ तुला आणि कीर्तन सोहळा अशा सात्विक अध्यात्मिक गोष्टींचा संगम पाहायला मिळाला. या दिवशी विठोबा गुरुजी व त्यांच्या पत्नी पारूबाई चौधरी यांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यांच्या मुलांनी – संभाजी चौधरी आणि संतोष चौधरी – आपल्या वडीलधाऱ्या व्यक्तींचा गौरव करत जो सन्मान आणि कृतज्ञतेचा आदर्श ठेवला, तो अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. या कार्यक्रमात ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे यांचे कीर्तन सोहळा उत्साहाच्या वातावरणात पार पडले. त्यांनी आपल्या प्रवचनात माता-पित्याचा सन्मान, संस्कार, आणि सात्विक जीवनाचे महत्त्व प्रभावीपणे उलगडले.



विठोबा हरि चौधरी गुरुजी यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त चौधरी कुटुंबाच्या वतीने कार्यक्रमात माता-पिता पूजन, ज्ञानेश्वरी ग्रंथ तुला आणि कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला होता. (छाया – लहू दळवी)

त्यांनी सांगितले की, मातापित्यांनी जर आहार, विहार आणि व्यवहार चांगले शिकवले तर सुसंस्कृत पिढी घडते. संतांची शिकवण अंगीकारली की जीवन सुंदर होतं आणि मन प्रसन्न राहतं. याच सात्विकतेतून दीर्घायुष्य मिळतं.

श्रीनिवास महाराज पुढे म्हणाले, विठोबा चौधरी गुरुजींनी केवळ आपल्या कुटुंबालाच नव्हे तर गावातही सद्गुणशीलतेचा आदर्श दिला आहे. त्यांच्या मुलांनी ज्याप्रमाणे ९१व्या वाढदिवसाच्या निमित्ताने पूजन आणि ज्ञानेश्वरी ग्रंथ तुला आयोजित केला आहे, त्यातून त्यांच्या कुटुंबातील मूल्यांचा परिचय होतो. या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य राणी लंके, भागाजी गावडे, डॉ. राजेश भानगडे, सुखदेव चितळकर, युवराज शिंदे, सचिन शिंदे, राम नळकांडे, ताराबाई चौधरी, संभाजी चौधरी, संतोष चौधरी, संजीवनी घुमटकर, रंजना रासकर, कुंडलिक आरवडे, शंकर पाटील, रवींद्र मैड, अरुण ढाकणे, विवेक खोसे, भारत राऊत, सागर थोपडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. संपूर्ण सोहळ्यात अध्यात्म, संस्कार आणि कृतज्ञतेची भावनात्मक सांगड घालण्यात आली होती. या कार्यक्रमातून कुटुंबसंस्था, वृद्धांचा सन्मान आणि संतसाहित्याचे महत्त्व या मूल्यांचा प्रत्यय आला.

आमचे वडील विठोबा चौधरी गुरुजी यांनी सायकलवर प्रवास करीत विद्यार्थी घडविण्याचे काम केले. आज त्यांचे विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये उच्च पदावर काम करत आहे. त्यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन केले असून आई-वडिलांची ज्ञानेश्वरी ग्रंथ तुला करण्यात आली. वडिलांचे समाजाशी असलेले ऋणानुबंध व अतूट नाते यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये त्याला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम करत होते असे मत संभाजी चौधरी यांनी व्यक्त केले.

# डॉ. सुवर्णा यांना रशियामध्ये 'ग्लोबल लिडर अ‍ॅवॉर्ड' प्रदान

नगर – रशियातील सेंट पिट्सबर्गमध्ये सिटीटेल हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या ग्लोबल ईकॉनॉमिक फोरम समिटमध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या ध्यानधारणा प्रशिक्षक नागठाणे सेवाकेंद्राच्या संचालिका १०० विश्वविक्रम करणाऱ्या १ ल्या भारतीय महिला बी के डॉ. सुवर्णा यांना भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार केल्याबद्दल ब्रिक्सचे सदस्य उद्योजक अ‍ॅन्ड्रयू चिरवा यांच्या हस्ते ग्लोबल लिडर अवॉर्डने सन्मान करण्यात आला.



बी के डॉ. सुवर्णा यांना रशियामध्ये ग्लोबल लिडर अवॉर्ड प्रदान करताना ब्रिक्सचे सदस्य उद्योजक अ‍ॅन्ड्रयू चिरवा आदी.

यावेळी मिस रशिया वालेरिया मिर व प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सेंट पिटर्सबर्ग रिट्रिट सेंटरच्या डायरेक्टर बी के संतोष दीदी उपस्थित होते.



छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने अनाम प्रेम संस्थेमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून फळांचे वाटप करण्यात आले.

# अखिल भारतीय छावा संघटनेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

नगर – छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने अनाम प्रेम संस्थेमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व फळे वाटप करण्यात आले. यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बोरसे साहेब समवेत अखिल भारतीय छावा संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव दत्ता वामन, छावा संघटनेचे सुरेखाताई सांगळे, छावा संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्ष शीलाताई शिंदे, रावसाहेब काळे, वेताळ मेजर, शिवप्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष बापू ठाणगे, अर्चना परकाळे, दीपक गहिले, सुनील ठाकरे, स्वाती गहिले आदी उपस्थित होतो.

वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बोरसे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या ८-९ वर्षाच्या कार्यकाळात एकूण १२० युद्ध लढली. महाराजांनी सर्वच्या सर्व युद्धात विजय मिळवला असा पराक्रम करणारे संभाजी महाराज हे एकमेव युद्ध होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासातून युवकांनी व सर्वांनी प्रेरणा घेतली पाहिजे. युवकांनी त्यांचा आदर्श समोर ठेवल्यास येणाऱ्या अडीअडचणी व समस्यांना सक्षमपणे तोंड देता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दत्ता वामन म्हणाले की, अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांची २० वर्षापासून जयंती विविध सामाजिक उपक्रमाने साजरी केली जाते. यावर्षी देखील अनाम प्रेम संस्थेत जयंती साजरी करण्यात आली आहे.

या वेळी उपस्थित सर्वांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे पराक्रम व इतिहास डोळ्यासमोर ठेवून आपले मनोगत व्यक्त केले.

# दलितांवरील अत्याचार रोखण्यासाठी 'स्वाभिमानी रिपब्लिकन' सज्ज, गावपातळीवर जातीयवादाविरुद्ध लढण्यासाठी व्यापक मोहिम जाहीर

नगर – नगर जिल्ह्यात वाढत्या दलितांवरील अन्याय, अत्याचार रोखण्यासाठी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षातील प्रमुख पदाधिकारी, नेते व कार्यकर्त्यांची आढावा बैठक नुकतीच शहरातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीत गाव पातळीवर उफाळलेल्या जातीयवादाचा समाचार घेण्यासाठी भीम आर्मीच्या माध्यमातून एक व्यापक जनजागृती मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीसाठी जिल्ह्यातील भीमसैनिक उपस्थित होते.



दलितांवरील अत्याचार रोखण्यासाठी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची शहरात बैठक पार पडली.

या बैठकीचे नेतृत्व नाथाभाऊ आल्हाट यांनी केले. यावेळी सल्लागार सदस्य तथा केंद्रिय रेल्वे मंत्रालय व दूरसंचार मंत्रालयाचे डॉ. आदित्य पतकराव, आझाद समाज पार्टीचे मुख्य महासचिव ॲड. क्रांती सहाने, महाराष्ट्र युवा प्रभारी वैभव चाबुकस्वार, राज्य महिला सचिव विजया साठे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

जिल्ह्यातील आंबेडकरी समाजाला संघटित करून त्यांच्यात जनजागृती निर्माण करण्यासाठी लवकरच सभा आयोजित करण्यात येणार आहे. या सभेला भीम आर्मी पक्षाचे खासदार चंद्रशेखर आझाद व महाराष्ट्र युवा प्रभारी वैभव चाबुकस्वार प्रमुख उपस्थित राहणार असल्याची माहिती डॉ. आदित्य पतकराव यांनी दिली.

दलितांवरील अन्यायाच्या घटनांमध्ये सत्ताधारी गट पोलीस प्रशासनावर दबाव टाकून दडपशाहीची भूमिका घेत आहेत. त्यामुळे दलितांना न्याय मिळण्यात अडथळे निर्माण होत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर बोलताना डॉ. आदित्य पतकराव म्हणाले की, महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दलितांवरील अत्याचाराची प्रकरणे गंभीर स्वरूपाची आहेत. आजही गावांमध्ये शांतता नाही, दलितांना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. नगर जिल्हा या बाबतीत आघाडीवर असून, आम्ही सर्वजण मिळून या अन्यायाविरुद्ध निर्णायक लढा देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नाथाभाऊ आल्हाट यांनीही ठाम भूमिका मांडत म्हणाले की, दलितांना संरक्षण देण्यासाठी जिल्ह्यातून मोठी ताकद उभी करण्यात येणार आहे. आंबेडकरी जनता एकत्र आल्यास जातीयवादाला मूठमाती देता येईल. समाजासाठी निस्वार्थीपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना या चळवळीत सामील करून प्रशासनावरही दबाव टाकण्याचे काम होणार असल्याचे सांगितले. शेवटी, उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संविधानाच्या मार्गाने न्याय मिळवण्यासाठी मोठे जनआंदोलन उभारण्याचा व गावा-गावातील दलितांवरील अन्याय थांबविण्यासाठी नाथाभाऊ आल्हाट यांच्या पाठीमागे उभे राहण्याचा निर्धार केला.

या बैठकीला भीमसैनिक किरण शिंदे, नंदू वाकडे, भागचंद सोनवणे, संदीप भिंगारदिवे, बॉक्सर भाई, अरुण शिंदे, आकाश शिंदे, लखन सरोदे, दीपक (भैय्या) गरुड, जालिंदर साळवे, विवेक घोडके, बाळासाहेब कांबळे, सुहास साठे, दीपक शिंदे, गोरख शिंदे, सचिन शिंदे, सतीश शिंदे, सुभाष गायकवाड, योगेश निकम, संदीप पगारे, प्रवीण साळवे, जयदेव गोगले, कल्याणी साळवे, भरत मनतोडे, ससाने आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षणाचे बाजारीकरण थांबविण्यासाठी अनधिकृत डोनेशन घेणाऱ्या शाळांसमोर 'सावित्रीबाई फुले जोडे पूजन' करून 'आंदोलन' करणार





नगर – सर्वसामान्य कुटुंबातील मुलांकडून बेकायदेशीर पद्धतीने फी आकारून सुरु असलेल्या शिक्षणाचे बाजारीकरण थांबविण्यासाठी पीपल्स हेल्पलाइनच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जोडे पूजन जारी करण्यात आला आहे. अनाधिकृत डमीशन फी घेऊन मुलांना प्रवेश देणाऱ्या शाळांची नावे जाहीर करुन त्या शाळांसमोर सावित्रीबाई फुले जोडे पूजन करुन आंदोलन केले जाणार असल्याची माहिती अॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अ नुसार, ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचं शिक्षण देणं ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र, अनेक खासगी व काही सरकारी शाळा या मुलांकडून बेकायदेशीर पद्धतीने फी आकारून या मूलभूत हक्काचा सरळसरळ भंग करत आहेत. हे शिक्षणाचं बाजारीकरण आहे, आणि याच अन्यायाविरोधात संघटनेच्या वतीने एक निर्णायक जनआंदोलन उभारण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

शाळा शिक्षणासाठी फी आकारतात, अशा शाळांच्या गेटवर सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा व त्यांचे जोडे पूजन करण्यात येईल. हे पूजन एका क्रांतीच्या स्मरणार्थ आणि जनतेचा आक्रोश यासाठी आहे. ही क्रांती आहे शिक्षणाच्या बाजारीकरणा विरोधात, आणि गोरगरीब मुलांसाठी न्याय मिळवण्यासाठी हे आंदोलन राहणार असल्याचे अॅड.गवळी यांनी म्हंटले आहे.

सर्व मुली या सावित्रीच्या लेकी आहेत आणि शिक्षण हे त्यांचं हक्काचं वारसाहक्क आहे. सावित्रीबाईंनी अंधश्रद्धा, जातीभेद, स्त्रीशिक्षणासाठी लढा दिला. आज त्या लढ्याला पुढे नेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. शिक्षणाचा हक्क कोणाच्याही खिशात विकत घेण्याची गोष्ट नाही! हा लढा केवळ फीविरोधात नाही, तर शिक्षणाला परत एकदा पवित्रतेचा, समतेचा आणि हक्काचा दर्जा मिळावा म्हणून संघटनेने पुढाकार घेतला असल्याचे सांगण्यात आले आहे.

बेकायदेशीररित्या घेतलेल्या सर्व फीची परतफेड केली जावी, अशा शाळांविरुद्ध कठोर कारवाई व्हावी, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर उत्तरदायित्व निश्चित करावं, सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर आधारित शिक्षणव्यवस्था उभी करण्याची मागणी पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आली आहे.

# महात्मा विद्यार्थी वस्तीगृहात प्रवेश प्रक्रियेस सुरूवात

नगर – शहराच्या माळीवाडा येथील महात्मा विद्यार्थी वस्तीगृह,




महात्मा फुले छत्रालयात सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता ५ वी ते १० वी मधील मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती–जमातीच्या तसेच अनाथ, निराधार, उपेक्षित व शिकण्याची इच्छा असलेल्या गरीब विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

भोजन, निवासाबरोबरच शालेय साहित्य, अभ्यासिका, वाचनालय, वर्तमानपत्रे, वैयक्तीक मार्गदर्शन आदी सुविधा वसतीगृहामार्फत उपलब्ध आहे. आर्थिक दुर्बल व होतकरू गरजू विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह महात्मा विद्यार्थी वस्तीगृह, माळीवाडा वेशीजवळ वस्तीगृहाच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९२७०४८११९८ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हटले आहे.

# नगर कॉलेजच्या टी.वाय.बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांचे यश

नगर – पुणे विद्यापीठाच्या अलीकडे घेण्यात आलेल्या अंतिम वर्ष बी.सी.ए. (सायन्स) परीक्षेत अहमदनगर महाविद्यालयाच्या टी.वाय.बी.सी.ए. सायन्स विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. विभागातील प्रथम चार विद्यार्थ्यांनी ९०.९ गुण सरासरी मिळवून उच्च गुणवत्तेचा दर्जा सिद्ध केला.



अहमदनगर महाविद्यालयातील टी. वाय. बी. सी. ए. सायन्स विभागाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पार, प्रोफेसर दिलीपकुमार भालसिंग आणि डॉ. सय्यद रज्ज़ाक आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये निकिता भांगे, जिया तुषार पाटील, आयेशा मतीन शेख व विवेक संतोष धावळे यांनी ९०.९ टक्के गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या यशाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, शिस्तबद्ध अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयाच्या शैक्षणिक वातावरणाचा फायदा घेत विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

बी.पी.एच.इ. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले, आजच्या स्पर्धात्मक युगात तंत्रज्ञान आधारित अभ्यासक्रमात उत्तम यश मिळवणे ही खरोखरच गौरवास्पद बाब आहे. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नव्हे, तर शिक्षक, पालक आणि संपूर्ण संस्थेच्या प्रयत्नांचे फळ आहे. संस्थेच्या वतीने आम्ही अशा गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करू. कार्यक्रमास प्रोफेसर दिलीपकुमार भालसिंग आणि डॉ. सय्यद रज्ज़ाक यांची उपस्थित होते.



इयत्ता दहावीचा परिक्षेत उल्लेखनीय यश मिळविणारे स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी.

# 'खेलो इंडिया युथ गेम्स' स्पर्धेमध्ये सुजय तनपुरेने पटकावले सुवर्णपदक

नगर – बिहार पटना येथे झालेल्या १७ वर्षाखालील खेलो इंडीया युथ गेम्स स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील शिउर गावचा सुजय तनपुरे याने फ्री स्टाइल कुस्ती स्पर्धेत ७१ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले आहे. त्याच्या या यशाबद्दल अहिल्यानगर राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष व जिल्हा कुस्तीगीर संघाचे जिल्हाध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी अभिनंदन केले आहे.



राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या पै. सुजय तनपुरे ने २०२३ सालीही जॉर्डन येथे झालेल्या १५ वर्षाखालील कुस्ती स्पर्धेत भारताला सुवर्णपदक जिंकून दिले होते. तसेच त्याने आजपर्यंत महाराष्ट्राला आणि देशाला अनेक पदके जिंकून दिली आहेत. आता खेलो इंडीया युथ गेम्स स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले आहे, अशी माहिती कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष अर्जुन शेळके यांनी दिली.



बीके डॉ. दीपक हरके यांनी रशियातील ब्रह्माकुमारीजच्या सेंट पिटर्सबर्ग रिट्रीट सेंटरला भेट देऊन तेथील बीके फॅमिलीच्या सदस्यांबरोबर संवाद साधला. यावेळी ब्रह्माकुमारीजच्या सेंट पिटर्सबर्ग रिट्रीट सेंटरच्या डायरेक्टर बीके संतोष दीदी यांच्या हस्ते बीके डॉ. दीपक हरके यांचा सन्मान करण्यात आला.

# स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के

नगर – स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल, अहिल्यानगर येथील इ. दहावीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा यशस्वीरित्या कायम राखत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता व संस्कृतीची उज्ज्वल साक्ष दिली आहे.

यावर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश मिळवले.

गुणवंत विद्यार्थ्यांचे निकाल पुढीलप्रमाणे: प्रथम क्रमांक: कोमल राजवानी – ८४.०८%, द्वितीय क्रमांक: प्रतिश सय्यवान – ७१.८०%, तृतीय क्रमांक: साई तुपे – ६८.६०%

या यशामध्ये विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीसोबतच, वर्ग शिक्षिका यास्मिन सय्यद यांचे मार्गदर्शन, सर्व विषय शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शाळेच्या बळकट शैक्षणिक मूल्यांची मोलाची साथ लाभली.

या यशाबद्दल शाळेचे मानद संचालक राजेंद्र शुक्रे, अनिवासी प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख आणि मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील एक आदर्श शाळा म्हणून उदयास येत आहे.

# श्री बाणेश्वर विद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत यश

नगर – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ या परीक्षेमध्ये तालुक्यातील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर, ता. जि. अहिल्यानगर या विद्यालयाचा विज्ञान शाखेचा शेकडा निकाल १००%, वाणिज्य शाखेचा निकाल ९८.६६%, कला शाखेचा निकाल ८७.०९% एवढा लागला असून विज्ञान, वाणिज्य व कला शाखेमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थी खालीलप्रमाणे :

विज्ञान शाखा – प्रथम – काकडे अकुल दत्तात्रय (६६.५० टक्के), भुजबळ राजवर्धन सुरेंद्र (६५.५०), चि.वाडेकर श्रीकांत लक्ष्मण (६४.३३)

वाणिज्य शाखा – प्रथम – कु. शेळके राजेश्वरी राम (८७.३३ टक्के), चि. जाधव करण दशरथ (७१.१७), चि. कराळे जितेंद्र मनोज (६९.५०)

कला शाखा – कु. अळकुटे स्नेहल रेवननाथ (८१.१७ टक्के), कु. पोटे साक्षी भिमाशंकर (६३.५०), कु. श्राद्धे गायत्री रमेश (६२.००)

वरील सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. शिवाजी कर्डिले, संस्थेचे संचालक अक्षय कर्डिले व इतर संचालक मंडळ तसेच रजिस्ट्रार श्री. बोर्डे, प्राचार्य हापसे के. एम., पर्यवेक्षक शिकारे सी. डी., ज्येष्ठ शिक्षक झावरे आर. वाय. यांनी अभिनंदन केले.

## भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूलची दहावीच्या उज्वल निकालाची परंपरा कायम

नगर – प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९७% लागला असून विद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये कु. उत्कर्षा शिवनाथ बेरड ९६%, श्रेयस गणेश वागस्कर ९४%, चंद्रांशु अजय थोरात ९२.४०%, आस्था दुर्गाप्रसाद परदेशी ९२%, रोहन किरण शेलुकर ९२%, असे यश संपादन केले. विद्यालयातील एकूण ९३ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यामध्ये विशेष प्राविण्य ३० विद्यार्थी, प्रथम श्रेणी ३१ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी २७ विद्यार्थी, पास श्रेणी २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक बाळासाहेब खोमणे सर, प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे सर, पर्यवेक्षिका कुमारी अनिता थापा आणि सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# केशवराव गाडीलकर विद्यालयाचा निकाल ९४ टक्के

नगर – सावेडी महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे केशवराव गाडीलकर हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल ९४ टक्के लागला असून कु. चांदगुडे वैष्णवी ही ८९ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली तर समृद्धी वाघमारे ही ८८.४० गुण मिळून दुसरी आणि दुर्गा गोल्हार ही ८८.२० गुण मिळून विद्यालयात तिसरी आली. १२ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले टेक्निकल विषयाचा निकाल सलग पाचव्या वर्षी १०० टक्के लागला.



केशवराव गाडीलकर हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल ९४ टक्के लागला असून कु. चांदगुडे वैष्णवी ही ८९ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मेजर ऋषिकेश गाडीलकर, सचिव नामदेवराव गाडीलकर, उपाध्यक्ष वसंतराव बेलेकर, मुख्याध्यापक अनिल गायकवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी यापुढेही काही अडचण आल्यास विद्यालयाशी संपर्क साधावा तसेच आपल्या गुणवत्तेनुसार योग्य ती शाखा निवडून विद्यालयाबरोबरच आई–वडिलांचे नाव उज्वल करावे असे संस्थेचे सचिव श्री. गाडीलकर यांनी सांगितले. नवीन सुरू झालेल्या ऑनलाईन प्रवेशाबद्दल बाबासाहेब शिंदे यांनी सविस्तर माहिती दिली.

# श्री चांगदेव विद्यालय नारायणडोहोचा ९१.४८ टक्के निकाल

## समृद्धी नवनाथ साठे ९५.८० टक्के गुण मिळवून मुलींमध्ये टाकळी काझी केंद्रात प्रथम

नगर – तालुक्यातील नारायणडोहो येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री चांगदेव माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९१.४८ टक्के लागला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळामार्फत फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस. सी. बोर्ड परीक्षेसाठी विद्यालयातून ४७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यावर्षी देखील उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता प्राप्त मिळवले आहेत. १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये, ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये तर ५ विद्यार्थी श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.



नारायणडोहो येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री चांगदेव माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १० वी चा निकाल ९१.४८ टक्के लागला आहे.

विद्यालयात गुणानुक्रमे प्रथम आलेले विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे कु. समृद्धी नवनाथ साठे (९५.८० टक्के) विद्यालयात प्रथम आली तर कु. श्रद्धा विशाल साठे (९४.८० टक्के) द्वितीय, कु. समृद्धी दिलीप गायकवाड (९२. ८० टक्के) तृतीय, कु. अमृता जितेंद्र शिंदे (९१.०० टक्के) चतुर्थ तर कु. दीप्ती विजय साळवे (८८. २० टक्के) पाचवी आली. यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक सोनवणे एस. जी., शिक्षक सत्रे एम. एस., श्रीमती थोरवे एस. आर., श्रीमती कार्ले एस. एम. व सुनिल म्हस्के व विद्यालयातील इतर सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त व शाळा समितीचे अध्यक्ष मुकेश मुळे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी पालक नवनाथ साठे, दिलीप गायकवाड, जितेंद्र शिंदे, विशाल साठे, विजय साळवे सर्व यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयातील इयत्ता १० वी च्या या सर्व यशस्वी विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे व प्रशासनाचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार अॅड. दीपलक्ष्मी म्हसे, श्री चांगदेव वसतिगृहाचे अधीक्षक धोंडे सर, महेश म्हस्के, घुंगार्डे सर, अकोलकर मॅडम, मतकर मॅडम, कदम भाऊसाहेब, भरत साठे, बाळासाहेब साठे, जाधव मामा, शाळा समितीचे सदस्य, नारायणडोहो परिसरातील शिक्षणप्रेमी पालक, माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# अहिल्यानगरमधील साईराज टेस्ट सिरिजचे २३ विद्यार्थी ठरले १० वीच्या परीक्षेतील टॉपर

नगर – नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता १० वी च्या परीक्षेच्या निकालात नगर मधील साईराज टेस्ट सिरिजचे २३ विद्यार्थी टॉपर ठरले आहेत. यामध्ये सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेत ७ तर एसएससी बोर्डाच्या परीक्षेत १६ विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची माहिती साईराज टेस्ट सिरिजचे संचालक प्रा. राजेश पवार यांनी दिली आहे.



मानसी सोमवंशी



अर्णव बांगर

नगरमधुन एसएससी बोर्डाच्या परीक्षेत टॉपर ठरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मानसी सोमवंशी ९६ टक्के, समर्थ श्रीगादी ९४ टक्के, पलक लुणावत ९१ टक्के, शरयू वाघमारे ९१.२० टक्के, कार्तिक काकडे ९१.२० टक्के, ऋग्वेद भूतकर ९२ टक्के, समृद्धी पानपाटील ९२ टक्के, साई चन्ना ९० टक्के, श्लोक पवार ९० टक्के, जुई खरमाळे ८८ टक्के, भक्ती मेश्राम ८९ टक्के, ईश्वरी पवार ८२ टक्के, गायत्री बडे ८० टक्के, इशांत चव्हाण ७७ टक्के, प्रथमेश तांबोळी ७६ टक्के, दिव्या मुथा ६७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

तर सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेत अर्णव बांगर ९४ टक्के, भावार्थ भागवत ९४ टक्के, सौमेंधु धावरी ९४ टक्के, साई धर्मा ९४ टक्के, हर्ष धाडगे ९० टक्के, शुभम वाळके ८८ टक्के, निहारिका खिलारी ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

साईराज टेस्ट सिरिजचे विद्यार्थी २४ तास फोन वरून कधीही प्रश्न विचारू शकतात, अर्थात मार्गदर्शन घेऊ शकतात. विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन विचारपूस करणे, विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क ठेवणे, तसेच प्रश्न पत्रिकेचा सराव करून घेणे, होत असणाऱ्या चुका ताबडतोब समजून सांगणे. असे उपक्रम राबविले जात असल्याने विद्यार्थी यशस्वी होत असल्याचे प्रा.पवार यांनी सांगितले.

अधिक माहिती साठी प्रा. राजेश पवार, संचालक साईराज टेस्ट सीरिज, अ.नगर. मो. ९८८१३२५४५४, ९८६०५०२२१६ यांच्याशी संपर्क साधावा.

# देवेंद्रनाथ विद्यालयाचा एसएससीचा निकाल ९७.७२ टक्के

नगर – येथील श्री नवनाथ देवस्थान सेवा मंडळ ट्रस्ट संचलित, श्रीदेवेंद्रनाथ माध्यमिक विद्यालय, बोल्हेगाव, अहिल्यानगर विद्यालयाचा एस.एस.सी.चा निकाल एकूण ९७.७२ टक्के लागला आहे. त्यामध्ये करणकुमार जितेंद्र साव व प्रणाली भाऊसाहेब साबळे या दोघांनीही ९०.८०% गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच शुभम जितेंद्र साव याने ८५.००% गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर सृष्टी नामदेव कोरडे हिने ८०.८०% मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे.



करणकुमार साव प्रणाली साबळे

विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्षा भाग्यश्रीताई फोडकर व सचिव मदन आढाव तसेच सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक डाके किशोर व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भोईटे उमेश व सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर वृंद यांनी अभिनंदन केले.

श्री राघवेंद्र स्वामी विद्यानिकेतन प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभाग व श्री देवेंद्रनाथ माध्यमिक विद्यालय बोल्हेगाव अहिल्यानगर तसेच पालकांनी बोल्हेगाव ग्रामस्थांनी सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे दहावी परीक्षेत नेत्रदीपक यश

नगर – राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांनी यावर्षीही दहावीच्या परीक्षेत अभिमानास्पद यश संपादन करत संस्थेची मान उंचावली आहे. अंध आणि मूकबधिर अशा दोन गटांतील एकूण ९ विद्यार्थ्यांनी आपल्या अपंगत्वावर मात करत ही कृतार्थता मिळवली आहे. हे केवळ शैक्षणिक यश नसून, त्यांच्या जिद्द, चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. विशेषतः अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक म्हणून कार्य करणाऱ्या मिलन गंधे, गीता महाजन, ज्योती पुरी, स्वाती रानडे व चेतन लांडगे यांचे योगदान उल्लेखनीय आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी रायटर म्हणून काम करणाऱ्यांचेही कार्य वाखाणण्याजोगे आहे.

संस्थेचे अध्यक्ष इंजी. अजित माने यांच्यासह डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. गिरीश कुलकर्णी, गोपीनाथ सरफरे, डॉ. मेघना मराठे, डॉ. रविंद्र सोमाणी, सीए अशोक पितळे, इंजी. अविनाश बोपर्डीकर, डॉ. सायली सतीश सोमण व अनिल गावडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मूकबधिर गटातील यशस्वी विद्यार्थी – कुणाल माने – ८०.८०%, अंजली काकडे – ७९.८०%, नेहा मोरे – ७६.८०%, गणेश बोंबले – ७५.२०%, कार्तिक शिरसाठ – ७३.६०%, धनराज काळकुटे – ७२.४०%, प्रतीक्षा सोनवणे – ६३.८०%

अंध गटातील यशस्वी विद्यार्थी – आयशा शेख – ६७.४०%, अजय गवळी – ५४.८०%

या विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द आणि कष्ट निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी आहेत.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## इथे चंद्र दिसतो उलटा!



चंद्राबद्दल आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट अशी की, काही देशांमध्ये तो उलटा दिसतो. आकाशात नेहमी चंद्राला आपण पाहत आलो आहे. दिवसेंदिवस त्याचा आकार बदलत असतो, हेदेखील आपण अनुभवत आलो आहोत. तो कधी लहान होत जातो, तर कधी मोठा होत जातो. चंद्राचा आकार हा अमावास्या आणि पौर्णिमेवर अवलंबून असतो. पण, आपण चंद्राला लांबूनच पाहू शकतो, त्यामुळे तो जवळून कसा दिसतो? हे सांगता येणे थोडे कठीण आहे. पण, सर्वात आश्चर्य म्हणजे जगातील काही कानाकोपऱ्यात काही देशांत चंद्र पूर्णाकृती नसताना चक्क उलटा दिसतो आणि यामागील रहस्य तितकेच साधे-सोपे आहे. प्रथम हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, चंद्र कधीही खरोखर उलटा होत नाही. तर त्यामागे सायन्स आहे. तो नेहमी एकाच स्थितीत राहतो. परंतु, पृथ्वीवरील आपल्या स्थानानुसार त्याचे दृश्य बदलते. उत्तर गोलार्धातील देशांमध्ये (जसे भारत, अमेरिका, युरोप) चंद्र एका विशिष्ट आकारात दिसतो, तर दक्षिण गोलार्धातील देशांमध्ये (जसे ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका) तो उलट्या आकारात दिसतो. ऑस्ट्रेलिया हा एक असा देश आहे की, जिथे चंद्र उलटा दिसतो. इथे चंद्राची कला (चंद्राचा आकार) उत्तर गोलार्धातील देशांपेक्षा विपरीत दिसते. उदाहरणार्थ, जर भारतात अर्धचंद्र डाव्या बाजूला वळलेला दिसत असेल, तर ऑस्ट्रेलियात तो उजव्या बाजूला वळलेला दिसेल. हे घडण्याचे कारण म्हणजे पृथ्वीचा गोलाकार आकार आणि तिची कक्षा. पृथ्वी सूर्याभोवती फिरते, तर चंद्र पृथ्वीभोवती फिरतो. उत्तर गोलार्धातील लोकांना चंद्र एका दिशेने दिसतो, तर दक्षिण गोलार्धातील लोकांना तो विरुद्ध दिशेने दिसतो. हे अगदी तसेच आहे, जसे एका इमारतीच्या दोन विरुद्ध बाजूंनी उभे राहून आपण एकाच वस्तूकडे पाहतो. या घटनेमुळे पर्यटकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण होते. अनेक लोक केवळ उलटा चंद्र पाहण्यासाठी ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडला भेट देतात. हे दृश्य विशेषतः पौर्णिमेच्या रात्री अधिक स्पष्ट आणि सुंदर दिसते. निसर्गाच्या या अद्भूत खेळामुळे आपल्याला कळते की, एकच गोष्ट वेगवेगळ्या दृष्टिकोनातून किती वेगळी दिसू शकते.

## मंगळावर झेब्रा क्रॉसिंग?



अमेरिकेतील जगप्रसिद्ध अवकाश संशोधन संस्था नासाची मंगळ ग्रहावर संशोधन मोहीम सुरू आहे. नासाच्या पर्सिव्हिअरन्स रोव्हरकडून मंगळ ग्रहावरील फोटो नासाकडे पाठवले जातात. नुकताच या रोव्हरने एक दगडाचा फोटो पाठवला असून, तो पाहिल्यानंतर वैज्ञानिक देखील आश्चर्यचकित झाले आहेत.

नासाच्या पर्सिव्हिअरन्स रोव्हरने मंगळावर एक वेगळा दगड शोधला आहे. या ग्रहावर जेझेरो क्रेटरमध्ये झेब्रा क्रॉसिंग असलेला दगड सापडला आहे. असा दगड मंगळावर यापूर्वी कधीच दिसला नव्हता. पर्सिव्हिअरन्स रोव्हरने काळे, पांढरे पट्टे असणारा हा दगड कॅमेऱ्यात कैद केला. नासाच्या शास्त्रज्ञांना काही दिवसांपूर्वी हे फोटो मिळाले. मात्र, तोपर्यंत रोव्हर तिथून दूर गेला होता. शास्त्रज्ञांनी या दगडाला 'फ्रेया कॅसल' असं नाव दिले आहे. असा दगड यापूर्वी मंगळावर कधीच दिसला नव्हता.

पर्सिव्हिअरन्स रोव्हर सध्या जेझेरो क्रेटरचे तीव्र चढण चढत आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये तो पहिल्यांदा या क्रेटरमध्ये उतरला होता. रोव्हरने हा क्रेटर चढायला सुरुवात करून जवळपास एक महिना झाला आहे. नासाच्या मते, सुरुवातीला रोव्हरचा वेग कमी होता. मात्र, अलीकडच्या काळात हे रोव्हर सपाट जमिनीवरून पुढे जात आहे.

रोव्हरने मंगळावर पाहिलेल्या काही विशेष दगडांपैकी 'फ्रेया कॅसल' आहे. नासाच्या रोव्हरला जूनमध्ये माऊंट वॉशबर्नजवळ एक अत्यंत हलक्या रंगाचा दगड दिसला होता. त्यानंतर जुलैमध्ये एक दगड सापडला होता, या दगडामुळे मंगळावर पूर्वी नदी असल्याची शक्यता वर्तवण्यात येतेय. शास्त्रज्ञांच्या मते, फ्रेया कॅसल केवळ ८ सेंटिमीटर रुंद आहे. रोव्हरने ज्या भागातून या दगडाचा फोटो पाठवला, त्या भागात असणाऱ्या इतर दगडांपेक्षा हा दगड वेगळा आहे. यावरूनच तो दगड दुसऱ्या ठिकाणावरून येथे आला असावा, असा अंदाज लावला जात आहे. नासाच्या मते, 'हा दगड दूरवरून तेथे आला असण्याची शक्यता आहे.' रोव्हरला या दगडाचा आणखी काही भाग क्रेटर चढताना सापडण्याची शक्यता नासांच्या शास्त्रज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. नासाने याबाबत एक निवेदन प्रसिद्ध केले असून, त्यामध्ये म्हटले आहे की, 'संबंधित दगडाच्या रासायनिक रचनेबद्दलचे ज्ञान मर्यादित आहे. परंतु प्रारंभिक व्याख्या असे सूचित करते की, आग्नेय किंवा रूपांतरित प्रक्रियांनी या दगडावर काळे-पांढरे पट्टे तयार झाले असावेत. आग्नेय प्रक्रियांमध्ये मॅग्माचे क्रिस्टलायझेशन समाविष्ट असते, तर रूपांतरित प्रक्रियेमध्ये उच्च उष्णता आणि दाबामुळे खडकांच्या संरचनेत बदल होतात.'

## कोरड्या बर्फाच्या अंतरंगात...



थोडी थंडी वाढली की कुडकुडायला होते. बर्फ हातात घेतला की काही वेळानंतर तो हातात धरेनासा होतो. पण, जगात सर्वात थंड गोष्ट कोणती असेल याचा आपण क्वचितच विचार केला असेल. आता ही सर्वात थंड गोष्ट म्हणजे कोरडा बर्फ ज्याला स्पर्श केले, तरी आपण गारठून जाऊ. कोरडा बर्फ हा खूप थंड असतो. हा कार्बन डायऑक्साईडचा घनरूप आहे. सामान्य घरगुती बर्फाचे तापमान उणे २-३ अंश सेल्सिअस असते. पण, कोरड्या बर्फाच्या पृष्ठभागाचे तापमान उणे ८० अंशांपर्यंत असते. त्याला स्पर्श करण्यास मनाई आहे. लिक्विड नायट्रोजन हे कोरड्या बर्फापक्षा जास्त थंड असते. माहितीनुसार लिक्विड नायट्रोजन हा सर्वात थंड पदार्थ मानला जातो. हा रंगहीन आणि चवहीन वायू आहे.

रसायनशास्त्रात नायट्रोजनचे संबोधन एनटू असे आहे. आपल्या वातावरणात नायट्रोजन मुबलक प्रमाणात आहे. पृथ्वीचा सुमारे एक आठवा भाग नायट्रोजन वायूने बनलेला आहे. सामान्यतः त्याचे तापमान - ३४६ सेल्सिअस आणि - ३२०.४४ सेल्सिअस दरम्यान असते. जे एखाद्या व्यक्तीला सहन करणे फार कठीण असते. अशा परिस्थितीत ते कोरड्या बर्फापेक्षाही धोकादायक ठरते. नायट्रोजन नेहमीच घन स्वरूपात उपलब्ध असतो. त्यामुळे त्याचे कृत्रिमरीत्या द्रवात रूपांतर होते. जेव्हा नायट्रोजनचे तापमान - १९५.८ अंश सेल्सिअसच्या खाली जाते, तेव्हा ते द्रव स्वरूपात रूपांतरित होते. आपल्या पृथ्वीवर असे कोणतेही ठिकाण नाही, जिथं तापमान इतके कमी आहे.



## वरदान ब्लूटूथ लेन्स चष्म्याचे

छत्तीसगडमधील विलासपूर येथे राहणाऱ्या रीना दिलकर या तरुणीने अतिशय कौतुकास्पद उपक्रम राबवला आहे. रीना हिने असा ब्लूटूथ लेन्स चष्मा तयार केला आहे, जो अशा लोकांना अपघातापासून वाचवेल, जे पाहू शकत नाहीत. या अनोख्या ब्लूटूथ चष्म्यामुळे दृष्टिहीन व्यक्तींना धोक्याचा इशारा आधीच मिळेल आणि त्यामुळे ते वेळीच दक्ष होऊ शकणार आहेत.



रीना दिलकर ही 'द गार्जियन अँड द गाईड' स्कूलमधील दहावीची विद्यार्थिनी असून, या अनोख्या आविष्कारासाठी तिला एपीजे अब्दुल कलाम इग्नायटेड माईंड चिल्ड्रन क्रिएटिव्हिटी अँड इनोव्हेशन अॅवॉर्डने सन्मानित केले गेले आहे. ज्या व्यक्ती पाहू शकत नाहीत, त्यांच्यासाठी हा नवा क्रांतिकारी शोध अनन्यसाधारण महत्त्वाचा ठरू शकेल, असे रीनाने याप्रसंगी म्हटले आहे.

रीनाने दिलेल्या माहितीनुसार, या चष्म्यात खास प्रकारचे ब्लू टूथ ग्लासेस वापरले गेले आहेत. यामध्ये खास प्रकारचे सेन्सर्स समाविष्ट आहेत. आसपास येणाऱ्या बाधा आणि वेगाने धावणारी वाहने याबाबत या माध्यमातून अॅलर्ट मिळणार आहे. जेणेकरून अशा व्यक्तींना वेळीच सावध होता येईल आणि यामुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाणही कमी होईल. ब्लूटूथच्या माध्यमातून मिळणारा ऑडिओ यात महत्त्वाचे योगदान देईल. या ऑडिओमुळे रस्ता शोधणे, रस्त्यावर वर्दळ नेमकी किती आहे, त्याची माहिती मिळणे शक्य होणार आहे. सध्या या

## रुबिक्स क्यूबची सर्वात लघुआवृत्ती

हंगेरियन आर्किटेक्चर प्राध्यापक आणि शिल्पकार एर्ने रुबिक यांनी १९७४ मध्ये एक क्यूब (ठोकळा) तयार केला होता. त्याला रुबिक्स क्यूब म्हणतात. हे एक थ्रीडी कोडे आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगांचे चौकोनी बॉक्स असतात. क्यूबच्या एका बाजूला एकाच रंगाचे बॉक्स एकत्र केल्यानंतर हे कोडे सुटते. पण, हे कोडे सोडवणे अजिबात सोपे नाही. त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. हे रुबिक्स क्यूब पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या रुबिक्स क्यूबची तांदळाच्या दाण्याएवढी छोटी आवृत्ती तयार करण्यात आली आहे. तिच्या आकारामुळे ती उघड्या डोळ्यांना नीट दिसतही नाही. अशा स्थितीत हे कोडं सोडवणं महाकठीण आहे.



या रुबिक्स क्यूबची किंमत इतकी जास्त आहे की, त्या पैशांत दोन बाईकदेखील सहज खरेदी करता येऊ शकतील. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डनुसार मेगा हाऊस नावाच्या जपानी कंपनीने जगातील सर्वात लहान रुबिक्स क्यूब बनवले आहे. ही कंपनी खेळणी बनवण्यासाठी प्रसिद्ध आहे. ते इतके लहान आहे की, सहज नखामध्ये अडकू शकते. त्याची रुंदी ४.९९ मिमी, उंची ४.९२ मिमी आणि लांबी ४.९९ मिमी आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने २३ ऑगस्ट २०२४ रोजी या क्यूबची जगातील सर्वात लहान रुबिक क्यूब म्हणून नोंद केली होती. हे क्यूब अॅल्युमिनियमचे असून, त्याचे वजन ०.३३ ग्रॅम आहे.

न्यूयॉर्क पोस्टने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार हे क्युब मॅन्युफॅक्चररच्या वेबसाईटवर प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध करण्यात आले. येत्या एप्रिलपर्यंत त्याच्या ऑर्डर्सची पूर्तता केली जाईल. हे क्यूब फिरवण्यासाठी चिमट्याची गरज भासेल. क्यूबसाठी प्रत्येक ऑर्डरसह एक स्टँड येईल. जगातील सर्वात लहान रुबिक्स क्यूब असे त्यावर लिहिलेले असेल. हे क्यूब ओरिजनल क्यूबच्या १००० व्या भागाइतके आहे. अनेक मशिन्स आणि कटिंग टूल्सच्या मदतीने त्याची निर्मिती केली गेली आहे. कंपनीने चार वर्षांपूर्वी असे क्यूब बनवण्याचा विचार केला होता. २०२२ पासून त्याची निर्मिती सुरू केली होती. मूळ रुबिक्स क्यूबला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हे नवीन लहान क्यूब रीलिज करण्यात आले. या रुबिक्स क्यूबची किंमत ५३२० डॉलर (४.४६ लाख रुपये) आहे. भारतात सामान्य बाईकची किंमत १ ते १.५ लाख रुपये आहे. म्हणजे या क्यूबच्या किमतीत सहजपणे दोन बाईक खरेदी करूनही काही पैसे शिल्लक राहतील.

## सर्वात छोटा विमानप्रवास



साधारणपणे एखाद्या फ्लाईटचा प्रवास अर्ध्या तासाचा तरी असतो. विमान पकडण्यासाठी बोर्डिंग, फ्लाईटचे टेकऑफ, लँडिंग आणि त्यानंतर विमानतळावरून बाहेर येणे यात तर आणखी बराच वेळ मोडतो. मात्र, जगातील सर्वात छोट्या विमानाची उड्डाणाची वेळ निव्वळ थक्क करणारी आहे. जगातील हा सर्वात छोटा विमान प्रवास स्कॉटलंड देशातील आहे. आश्चर्य म्हणजे या फ्लाईटचे अंतर जेमतेम अडीच किलोमीटरपेक्षा किंचित अधिक असून केवळ ८० सेकंदांत अर्थात एक मिनिट २० सेकंद इतक्या अल्प कालावधीत हे विमान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी झेपावते आणि दुसऱ्या ठिकाणी पोहोचतेदेखील! तसे पाहता सध्या विमान प्रवास अगदी सर्वसामान्यांच्या आवाक्यातही आला आहे. त्यामुळे बरेच जण विमान प्रवासाला प्राधान्य देताना दिसून येत आहेत. स्कॉटलंडमधील हा केवळ ८० सेकंदांचा विमान प्रवास मात्र निव्वळ आश्चर्याचा धक्का देणारा आहे. जगातील हा सर्वात लहान हवाई प्रवास फक्त २.७ किलोमीटरचा आहे. स्कॉटलंडमधील ऑर्कने द्वीपसमूहातील वेस्ट्रे आणि पापा वेस्ट्रे या दोन बेटांदरम्यान हा प्रवास आहे. या दोन बेटांमधील अंतर केवळ २.७ किलोमीटर आहे, जे एक लहान विमान अवघ्या ८० सेकंदात पार करू शकते. या दोन बेटांमधील इतक्या कमी अंतरासाठी हवाई प्रवास का आवश्यक आहे, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होईल आणि त्याचे कारणदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. याचे कारण म्हणजे या दोन बेटांमध्ये एकही पूल किंवा इतर कोणतेही साधन नाही, ज्याद्वारे लोक एका बेटावरून दुसऱ्या बेटावर जाऊ शकतात. त्यामुळे येथील रहिवाशांना हवाई प्रवास हाच एकमेव पर्याय आहे. यामुळे येथे विमान एकाच धावपट्टीवरून उड्डाण घेते आणि काही सेकंदात आपल्या इच्छित ठिकाणी पोहोचते. हे फ्लाईट दिवसातून अनेकवेळा चालवले जाते. ज्यामुळे तेथील रहिवाशांची मोठी सोय होते. या उड्डाणाला गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात लहान व्यावसायिक उड्डाणाचा दर्जादेखील देण्यात आला आहे.


## कार्बन उत्सर्जनाची चिंता मिटणार?



कार्बन उत्सर्जनामुळे पृथ्वीचे तापमान वाढत चालले आहे. हे उत्सर्जन वातावरणात पसरू नये यासाठी एक युक्ती वैज्ञानिकांनी शोधून काढलेली आहे. त्यांनी एका सच्छिद्र द्रवाचा शोध लावलेला असून त्याच्या मदतीने कार्बन उत्सर्जन गोळा करता येते, परिणामी ते वातावरणात मिसळत नाही. सच्छिद्रतेचा गुणधर्म असलेला द्रव जगात प्रथमच तयार करण्यात आला आहे.

ब्रिटनमधील बेलफास्टच्या क्वीन्स विद्यापीठ व लिव्हरपूल विद्यापीठाच्या संशोधकांनी तसेच त्यांच्या आंतरराष्ट्रीय भागीदारांनी हा नवीन द्रव शोधून काढला आहे. त्यात खूप मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू विरघळवता येतात. हे वायू द्रवाच्या सच्छिद्रता गुणधर्मामुळे शोषले जातात. अनेक पर्यावरण स्नेही रासायनिक प्रक्रिया यातून शोधता येतील. सध्या कार्बन पकडून तो समुद्राच्या तळाशी गाडला जातो, त्याला कार्बन सिक्वेस्ट्रेशन असे म्हणतात त्यापेक्षा तो सच्छिद्र द्रवाने पकडता येत असेल तर ते जास्त फलदायी आहे. जीवाश्म इंधनांमुळे कार्बन व हरितगृह वायूंची निर्मिती होत असते, पण हे वायू या सच्छिद्र वायूने शोषून घेता येतात. ज्या पदार्थात निसर्गतः सच्छिद्रता असते त्यांचा उपयोग सध्या प्लास्टिकपासून पेट्रोलपर्यंत अनेक पदार्थ तयार करण्यासाठी होतो, असे क्वीन्स स्कूल ऑफ केमिस्ट्री अँड केमिकल इंजिनिअरिंग या संस्थेचे स्टुअर्ट जेम यांनी म्हटले आहे. अगदी आतापर्यंत हे सच्छिद्र पदार्थ हे घन रूपात होते. झिओलाईट हे त्याचे एक उदाहरण, पण रेणूंचे काही आकार तयार करून सर्वच जागा व्यापणार नाही असा द्रव तयार करता येतो. त्यामुळे तो द्रव सच्छिद्र असतो. त्या छिद्रांमुळे हरितगृह वायू द्रवात सामावले जातात. हा द्रव नवीन प्रकारचा असून त्याचा हा उपयोग अभिनव आहे. विशिष्ट प्रकारच्या कार्बनी रेणूची पिंजऱ्यासारखी रचना व द्रावक घटक वापरून सच्छिद्रता असलेला द्रव पदार्थ जगात पहिल्यांदा तयार करण्यात आला आहे. आणखी काही वर्षांच्या संशोधनानंतर त्याचा वापर हरितगृह वायू पकडण्यासाठी मोठ्या प्रमाणात करता येईल, त्यांची वायू सामावण्याची क्षमता वाढवता येईल असे त्यांनी सांगितले. नेचर या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

## धावताना 'ही' घ्यावी काळजी...



मॉर्निंग वॉक किंवा धावणे हा एक उत्तम व्यायाम आहे; मात्र धावत असताना काही चुका केल्या तर त्याचा परिणाम गुडघ्यांवर होतो. त्यामुळे गंभीर नुकसान होऊ शकते, असे तज्ज्ञ सांगतात.

धावण्यासाठी चुकीचे फुटवेअर निवडण्याने तुमचे नुकसान होऊ शकते. तुमचे पाय, गुडघे आणि सांध्यावर चुकीचा परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे सांधे कमकुवत होऊ शकतात. त्यामुळे धावण्यासाठी जे रनिंग शूज असतात त्याचाच वापर करावा. धावण्याच्या आधी वॉर्मअप करणे खूप गरजेचे आहे. स्ट्रेचिंग आणि थोडा व्यायाम केल्याने शरीर मोकळे होते. धावताना शरीराची योग्य स्थिती असणे फार महत्वाचे आहे. जर तुम्ही चुकीच्या स्थितीत धावत असाल, जसे की खांदे झुकवून किंवा पायाची चुकीची स्थिती यामुळं सांध्यावर अवाजवी ताण येतो. त्यामुळे सांधेदुखी आणि अशक्तपणा येतो. खूप जास्त धावल्याने शरीर आणि सांध्यावर दबाव येऊ शकतो. आराम न करता धावल्याने मांसपेशी आणि सांधे कमजोर होऊ शकतात. त्यामुळं गंभीर इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे शरीरालाही पुरेसा आराम देण्याची गरज असते.

